cmyk

## संपादकीय

### एकदाचा संभ्रम मिटवा...!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर विरोधी पक्षांनी इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिनचा मुद्दा लावून धरला आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी ईव्हीएमबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. पुन्हा एकदा मतपत्रिकांद्वारे मतदान घेतले जावे, या मागणीसाठी देशव्यापी मोहीम सुरू करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले, खर्गे यांच्या घोषणेच्या एक दिवस अगोदरच सर्वोच्च न्यायालयाने मतपत्रिकांद्वारे पुन्हा मतदान घेतले जाण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली होती. केवळ एवढ्यावरच न्यायालय थांबले नाही, तर त्यांनी याचिकाकर्त्याला चांगलेच फटकारले होते. त्यातून सर्वच राजकीय पक्षांना न्यायालयाने संदेश दिला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२१८ | शनिवार, दि.३० नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये



**कामासाठी मुले पाहिजेत**

मोबईलच्या होलसेल दुकानात काम करण्यासाठी होतकरू मुले पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल.

सेल्समन : ०२ (जागा)
ऑफिस बॉय : ०१ (जागा)

संपर्क:: मो.९२२५१४१४४०


# बोगस बियाणे, बनावट खत विक्रेत्यांवर कठोर कारवाई

## केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांचे अधिकाऱ्यांना आदेश

**दिल्ली । वृतसंस्था**

**बनावट बियाणे, खत आणि किटकनाशकांची बाजारात सर्रास विक्री केली जात असल्याने केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंत्रायलायतील अधिकाऱ्यांना कडक करावाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यासाठी राज्य सरकारांसोबत चर्चा करून निर्णय घ्यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत, अशी माहिती कृषी विभागाने निवदेनातून प्रसिद्ध केली आहे.**

देशभरात शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाची खतं, बियाणे आणि किटकनाशके मिळतील, याची खात्री केली पाहिजे, असे शिवराजसिंह चौहान म्हणाले. शेतकऱ्यांच्या हिताशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकरी निकृष्ट दर्जाचं खतं बियाणे, किटकनाशक मिळाल्या म्हणून तक्रार करतात. ◀◀ पान २ वर

### महाराष्ट्राच्या बोगस बियाणे प्रतिबंधात्मक कायद्याकडे लक्ष

महाराष्ट्रात बोगस बियाणे आणि बनावट खत प्रतिबंधात्मक कायद्यासाठी विधीमंडळात विधेयक मांडण्यात आलेले आहे. या विधेयकांमध्ये बोगस बियाणे आणि बनावट खत विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर दंड लादणे, अजामीनपात्र गुन्हा दाखल करणे, मोका कायदा लावणे, कैद करणे अशा तरतुदी आहेत.



# महागाईमुळे देशाचा जीडीपी कोसळला

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देशाचा विकासाचा दर कमालीचा मंदावला आहे. २०२४–२५ च्या दुसऱ्या तिमाहीचा आर्थिक विकास दर दोन वर्षांच्या निच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. एक वर्षापूर्वी याच काळात हा विकास दर ८.१ टक्के होता तो आता ५.४ टक्क्यांवर आला आहे.**

देशातील महत्वाच्या भागातील कमकुवत मागणी आणि प्रतिकूल हवामान यामुळे यंदा जीडीपीची वाढ मंदावल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे. पहिल्या तिमाहीत हा दर ६.७ टक्के राहिला होता. कृषी क्षेत्राचा एकूण मूल्यवर्धित दर २०२३–२४ च्या जुलै–सप्टेंबर तिमाहीत ३.५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. हाच दर गेल्या वर्षी १.७ टक्के होता. परंतू उत्पादन क्षेत्राचा एकूण मूल्यवर्धित दर हा गेल्या वर्षीच्या १४.३ टक्क्यांवरून २.२ टक्क्यांवर घसरला आहे. जीडीपी घसरण्यामागे अर्थतज्ज्ञांच्या मते अन्नधान्याची वाढती महागाई, उच्च कर्ज खर्च आणि स्थिर वेतनवाढ यांचा समावेश आहे.



# माकेगाव शिवारात बैलाचा पाडला फडशा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**तालुक्यातील काही भागात बिबट्याने धुमाकूळ घातला असून त्याच्या वावराने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. पुस जवळगाव, ममदापूर पाटोदा या नंतर आता बिबट्याने माकेगाव परिसरात मोर्चा वळवला आहे. माकेगाव येथील शेतकरी रवि देशमुख यांच्या शेतातील बैलाचा बिबट्याने फडशा पाडला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी त्याचा शोध घेत आहेत, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.**


पुस जवळगाव परिसरात विवेक आटोळे यांच्या शेतात काल बिबट्याचा वावर दिसून आला. त्याने एका शेळीचा फडशा पाडला असल्याची चर्चा चांगलीच रंगली होती. ही घटना ताजी असतानाच काल रात्री पुन्हा ममदापूर पाटोदा परिसरातील लेंडी शिवारात बिबट्या दिसून आला आहे. एका ग्रामस्थाने बिबट्याचा व्हिडिओ त्याच्या चारचाकी गाडीतून कैद केला आहे. तो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यानंतर आता बिबट्या माकेगाव शिवारात शिरला आहे. माकेगाव परिसरातील कॅनालच्या बाजूला असलेल्या पत्री पुलाजवळ बिबट्याने रवि देशमुख ◀◀ पान २ वर

# पवार, ठाकरेंना महायुतीत घेण्याचा मोदी-शहांचा डाव?

## मने वळवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु; शिंदे, अजितदादा काय भुमिका घेणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभेचा निकाल लागून ७ दिवस झाले तरी सुध्दा मुख्यमंत्री कोण होणार? याचे उत्तर राज्यातील जनतेला भाजपने दिले नाही. १३२ आमदार असलेल्या भाजपकडून सध्या वेगळीच खेळी खेळली जात असल्याची विश्वसनीय सुत्रांची माहिती असून शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांना महायुतीत घेण्यासाठी त्यांची मने वळवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु असल्याचे समजते. पवार, ठाकरे महायुतीत आले तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार नेमकी काय भुमिका घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकनाथ शिंदेंनी ताठर भुमिका घेतल्यानेच भाजप हा वेगळा डाव टाकत असल्याची जोरदार चर्चा आहे.**



राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजप १३२, शिंदेसेना ५७ आणि अजित पवार गटाने ४१ जागा जिंकून विधान सभा निवडणुकीत मोठे यश मिळवले आहे. निकाल लागून सात दिवस झाले तरी भाजपने अद्याप तरी आपला गटनेता निवडलेला नाही. शिंदे व अजितदादांनी त्यांच्या पक्षाचा गटनेता निवडला आहे. भाजप अजूनही मुख्यमंत्री पदाच्या नावापर्यंत पोहचलेले नाही. भाजपच्या नेतृत्वासमोर मोठा पेच असून राज्यातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला तर देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री केले तर पुन्हा निवडणुकीपुर्वीची परिस्थिती राज्यात होऊ शकते, याचा अंदाज भाजपच्या नेतृत्वाला आलेला असावा. तसेच फडणवीस मुख्यमंत्री झाले तर मनोज जरांगे पाटील, शरद पवार आणि उध्दव ठाकरे हे शांत बसणारे नाहीत. त्यामुळे त्याचा थेट फटका ◀◀ पान २ वर

### ठरले..५ डिसेंबरला शपथविधी

गेल्या अनेक दिवसांपासून नवीन सरकार कधी स्थापन होणार याकडे अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष लागून आहे. तर कोणाला कोणतं मंत्रिपद मिळणार याचीही चर्चा सुरु आहे. त्यात आता ही माहिती समोर आली आहे. येत्या ५ डिसेंबरला महायुतीच्या नव्या मुख्यमंत्र्याचा शपथ विधी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तर ५ डिसेंबरला नव्या मुख्यमंत्र्याचा शपथ विधीसाठी आझाद मैदानाची चाचपणी केली जात आहे. महायुतीच्या नेत्यांचा एकमुखाने निर्णय झाला असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, येत्या १ डिसेंबर रोजी भाजपच्या गटनेता निवडीची बैठक होणार असल्याची माहिती समोर येत आहे. या बैठकीसाठी भाजप आमदारांना आज संध्याकाळपर्यंत निरोप दिला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. भाजपच्या गटनेता निवडीच्या बैठकीनंतर महायुतीच्या आमदारांची बैठक होणार असल्याची माहिती आहे. या महायुतीच्या बैठकीनंतर दिल्लीतून आलेले निरीक्षक मुख्यमंत्रिपदाची घोषणा करणार आहेत. तरभाजपचेनिरीक्षक मुंबईत येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

### अजित पवारांना सोईचे होईल

शरद पवारांपासून बाजूला गेल्याने अजित पवारांवर सुरुवातीला मोठी टिका झाली होती. त्याची धार अजूनही कमी झालेली नसून शरद पवार महायुतीत आले तर अजित पवारांच्या सोईचे होऊ शकते, असे म्हटले जात आहे.

### काँग्रेसला एकटे पाडण्याची खेळी

मविआच्या माध्यमातून राज्यात काँग्रेस, शरद पवार गट, आणि ठाकरेसेना यांनी लोकसभा निवडणुक एकत्र लढवून मोठे यश मिळवले. त्या तुलनेत विधानसभेला यश मिळाले नसले तरी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मविआ आपली ताकद दाखवू शकते, असे म्हटले जात आहे. त्यामुळे त्या अगोदरच पवार, ठाकरेंना मविआच्या बाजूला काढण्याचा भाजपची खेळी असू शकते. तसे झाले तर काँग्रेसचा एकटे पाडण्यात भाजप यशस्वी होऊ शकेल.

### शिंदे अडून बसले, गृहखाते दिले तरच...

राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे, मात्र अजूनही नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा करण्यात यालेली नाही. समोर आलेल्या माहितीनुसार येत्या ५ डिसेंबर रोजी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी होणार आहे. मात्र त्यापूर्वी शिवसेना शिंदे गटातून एक मोठी बातमी समोर आली आहे. ती म्हणजे सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे हे गृहमंत्रिपदावर अडून बसले आहेत. गृहमंत्रिपद मिळालं तरच एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपद स्विकारणार आहेत, अन्यथा उपमुख्यमंत्रिपद हे शिवसेना शिंदे गटातील दुसऱ्या एखाद्या वरिष्ठ नेत्याला मिळण्याची शक्यता आहे.

# बीड जिल्हाधिकारी पदाचा डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्वीकारला पदभार

**बीड। प्रतिनिधी**



बीड जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ (भा. प्र. से ) यांनी आज स्वीकारला. जिल्हाधिकारी अविनाश पाठक (भा. प्र. से ) प्रशिक्षणासाठी जात आहेत. त्यामुळे बीड जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार त्यांनी जालना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे सोपविला.जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ २७ डिसेंबरपर्यंत अभ्यागतांसाठी मंगळवारी आणि गुरुवारी उपलब्ध राहणार आहेत.

# जितेंद्र आव्हाडांनी घेतली एकनाथ शिंदेंची भेट; राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण



**मुंबई । प्रतिनिधी**

**एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊन राज्यात नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहत आहेत. अशातच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे शुक्रवारी दुपारी एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी वर्षा निवासस्थानी पोहचले. त्यामुळे या दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली? किंवा भेटीचे कारण काय होते? अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात होताना दिसत आहे.**

महायुतीला प्रचंड बहुमत मिळून ◀◀ पान २ वर

# श्रीक्षेत्र नारायणगड संस्थानच्या विश्वस्तपदी संभाजी महाराज



**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची धाकटी पंढरी संबोधल्या जाणाऱ्या क्षेत्र संस्थान नारायणगड संस्थांनच्या रिक्त असलेल्या विश्वस्तपदी विश्वस्त ◀◀ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ नोव्हेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड :१४५.५० क्विंटल | १,८७० | २,८७० | २,२४६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : २.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| बाजरी: २४.०० क्विंटल | २,५०० | २,९४२ | २,७८८ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: ३३०.५० क्विंटल | ३,९०० | ४,२५० | ४,१४७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,६०० | ६,४०१ | ५,५०० |

# संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज २ डिसेंबरपर्यंत तहकूब

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा पहिला आठवड्यात दोन्ही सभागृहांचे कामकाज व्यवस्थित होऊ शकले नाही. विरोधकांनी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून अदानी प्रकरण, मणिपूर आणि संभलमधील हिंसाचाराच्या मुद्द्यावरुन गदारोळ केला. शुक्रवारीही या मुद्द्यांवरुन विरोधकांचा गदारोळ सुरुच राहिला. शुक्रवारी, बांगलादेशातील हिंदू हिंसाचाऱ्याच्या मुद्द्यावरुन दोन्ही सभागृहात विरोधकांनी गदारोळ केला. ◀◀ पान २ वर

# एकनाथ शिंदे यांनी वक्फ बोर्डाला दिलेला निधी देवेंद्र फडणवीसांकडून अखेर रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यात विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू करण्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने विविध समाजघटकांना खुष करण्याचा सपाटाचा लावला होता. त्यावेळी शेवटच्या दिवसात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वक्फ बोर्डाला १० कोटी रूपये देण्याचा निर्णय घेतला. तसेच वक्फ बोर्डाशी संबधित एका कार्यालयाचे उद्घाटनही केले होते. त्यावरून हिंदूत्ववादी विचाराच्या काही कलावंतानी आणि भाजपाशी संबधित संघटनांच्या प्रतिनिधींनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली होती. मात्र राज्यातील विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता आणि निवडणूकीचा ◀◀ पान २ वर

# अंबाजोगाईच्या गोदामातील धान्याला पाय फुटले

## गरीबांना मिळणारे मोफत धान्य कोणाच्या घशात; पन्नास किलोच्या तांदळाच्या पोत्यात निघाले चाळीस किलो

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील शासकीय गोदामात आलेल्या गहू व तांदळाला कट्ट्यागणीस दहा किलोला पाय फुटल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाला कोणाच्या पाठबळ आहे. हा संशय व्यक्त केला जात आहे. स्वस्त धान्य दुकानदारांच्या दिलेल्या धान्यातून पोत्यातून माल कसा गायब होतो. याकडे तहसीलदार व उपजिल्हाधिकारी लक्ष देणार का? याकडे लक्ष लागले आहे.**

शासनाच्या वतीने गरीब नागरिकांना मोफत गहू व तांदळाचे वाटप कर्ते परंतु गरीबासाठी आलेले धान्य पोत्यातून गायब होवू लागले आहे. अंबाजोगाईच्या गोदाम रक्षक म्हणून एस.आर.बलुतकर यांची ऑर्डर झालेली असतानाही तहसीलदाराच्या आशिर्वादाने दुसर्याच व्यक्तीला या गोदामात बसविले आहे. त्यामुळे या गोदामात सध्या सावळा गोंधळ सुरू आहे. शासनाकडून पन्नास किलोच्या पोत्यामधील दहा किलो धान्य गायब होत असून हे धान्य कोणाच्या घशात जात आहे. हा संशयाचा विषय आहे. शासकिय धान्य घोटाळ्यात बीड पासून स्थानिक पातळीपर्यंत यंत्रणा बरबटली असून याकडे कोणी लक्ष देणार का? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. शासनाकडून नियमाप्रमाणे एका पोत्यामध्ये पन्नास किलो धान्य व पाचशे ग्रॅम पोत्याचे वजन क्रम बाह्य आहे. परंतु अंबाजोगाईच्या गोदामातून चाळीस किलो धान्य व पोत्याचे २४० या प्रमाणे धान्य स्वस्त धान्य दुकानदाराला वाटप होत आहे. आज शुक्रवारी अंबाजोगाई तालुक्याती येल्डा येथील ग्रा.प.कार्यालया अंतर्गत असलेल्या स्वस्त धान्य दुकानदाराला दिलेले धान्य पोत्यासह काट्यावर मोजमाप केले असता. चाळीस किलो धान्य निघाले. उर्वरीत दहा किलो धान्य कोणाच्या घशात गोदाम रक्षक घालित आहे. याची चौकशी करणे गरजेचे आहे. अंबाजोगाईतील सावळ्या गोंधळाकडे जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी चौकशी करणार का? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे.



cmyk

## अग्रलेख

# एकदाचा संभ्रम मिटवा...!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर विरोधी पक्षांनी इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिनचा मुद्दा लावून धरला आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी ईव्हीएमबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. पुन्हा एकदा मतपत्रिकांद्वारे मतदान घेतले जावे, या मागणीसाठी देशव्यापी मोहीम सुरू करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले, खर्गे यांच्या घोषणेच्या एक दिवस अगोदरच सर्वोच्च न्यायालयाने मतपत्रिकांद्वारे पुन्हा मतदान घेतले जाण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली होती. केवळ एवढ्यावरच न्यायालय थांबले नाही, तर त्यांनी याचिकाकर्त्याला चांगलेच फटकारले होते. त्यातून सर्वच राजकीय पक्षांना न्यायालयाने संदेश दिला. आता प्रश्न असा आहे की. पक्ष हा संदेश स्विकारणार का आणि दुसरी बाब म्हणजे राजकीय पक्षांकडून ईव्हीएमच्या संदर्भात ज्या उणिवांकडे बोट दाखवले जाते आहे, त्यावर निवडणूक आयोगाची काय प्रतिक्रिया आहे? जेव्हा कोणी निवडणुकीत पराभूत होतो तेव्हाच ईहीएम खराब आहे, त्यात छेडछाड केली केली असे आरोप होतात. जर तीच व्यक्ती किंवा पक्ष विजयी झाला तर मात्र ईव्हीएमच्या विरोधात कोणी काही बोलत नाही. याकडे आम्ही कसे पाहायचे, असा सवाल सुप्रीम कोटनेही केला आहे. त्यांचा प्रश्न वस्तुस्थितीला धरून आहे. कारण, सत्ता येण्याची अपेक्षा असतानाच तिने हुलकावणी दिली किंवा अपेक्षेनुरूप निकाल आले नाहीत की ओरड सुरू होते. न्यायालयातील सुनावणीच्या वेळी आंध्र प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी या दोघांचे उदाहरण समोर ठेवले गेले. नायडू जेव्हा पराभूत झाले होते तेव्हा त्यांनीही ईव्हीएमला आक्षेप घेतला. आता विजयी झाल्यावर ते काहीच बोलले नाहीत, याउलट आता पराभूत झालेले जगनमोहन रेडी यांनी ईव्हीएम बद्दल शंका व्यक्त केली. हा पायंडाच पडला असल्याचेच न्यायालयाला सूचित करायचे होते आणि या विषयावर युक्तिवाद किया वादविवाद करायचे हे स्थान नाही, असेही न्यायालयाने सुनावले.

मतपत्रिकांद्वारेच पुन्हा मतदान घेण्याची मागणी न्यायालयाने ज्या आधारावर फेटाळली आहे त्यावरही विचार होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात निकाल विरोधी पक्षांच्या अपेक्षेच्या विपरीत आल्यामुळे गदारोळ आहे. तेच झारखंडमध्ये निकाल त्यांना अनुकूल आल्याबदल सगळे गप्प आहेत. गमतीने असाही युक्तिवाद केला जातोय की जाणूनबुजून लहान राज्य सोडून मोठे राज्य मिळवण्यासाठीच ही सेटींग केली गेली असावी, अशी विधाने येण्याची कारणे म्हणजे मनात घुसलेले संशयाचे भूत. एकदा मनात संशय निर्माण झाला की त्रैलोक्यातही संचार केला तरी मन:शांती लाभत नाही. दावे अनेक झाले आहेत. तरीही वास्तव तेच आहे की ईव्हीएमच्या विरोधात म्हणजे त्यात त्रुटी आहे किंवा गोलमाल आहे असे सिद्ध करणारा एकही पुरावा अद्याप कोणीही सादर करू शकले नाही. परवा न्यायालयातही अमेरिकेचे इलॉन मस्क यांच्या टिप्पणीचा आधार घेतला गेला, ईव्हीएममध्ये छेडछाड करता येऊ शकते असे मस्क अलीकडे म्हणाले होते, मस्क आणि त्यांच्या कंपन्या कितीही तंत्रकुशल असल्यातरी त्यांच्या या एका विधानाच्या आधारे आपण सगळे शंकास्पद मानायचे का? बरे मस्क यांनी काही सिद्ध केले नसतानाही मस्क जसे म्हणतात म्हणजे ते बरोबरच असेल असे गृहीत धरायचे का? ईव्हीएम सोडून पुन्हा एकदा मतपत्रिकांच्या काळाकडे परतणे म्हणजे प्रतिगामी पाऊल ठरेल असे मागेच न्यायालयाने म्हटले होते. ईव्हीएमपूर्वीची निवडणूक प्रक्रियाही प्रचंड गैरप्रकारांनी बोकाळली होती. आता पुन्हा त्या सर्व बाबी म्हणजे मतदान केंद्र ताब्यात घेणे, एकाच गुंडाने केंद्रात घुसून सगळ्यांचे शिक्के मारणे किंवा मतपेट्या पळवणे हे सगळे स्वीकारण्याची तयारी करायची आहे का? आरोप करताना राजकीय पक्षांचे एका गोष्टीकडे सर्रास दुर्लक्ष होते ती गोष्ट आहे मतदारांची राजकीय सूत्रता, मतदार प्रगल्भ आहेत व त्यांनी वेळोवेळी ते सिद्ध केले आहे. काही राज्यांची प्रथा अशी आहे की ते केंद्रात एका पक्षाला आणि राज्यात दुसऱ्या पक्षाला सत्तेवर आणतात. काही राज्ये दर पाच वर्षांनी सरकर बदलतात. लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणुका एकत्र होत असतील तरी त्यांचा कौल बदलत नाही. त्यांना राज्यात जो हवा आहे त्याला आणि केंद्रात जो हवा आहे त्याला ते मते देतात. मतदार एवढे सूज्ञ असताना आपल्या पराभवाच्या अन्य कारणांची मीमांसा करणे हे राजकीय पक्षांचे काम आहे. केवळ ईव्हीएमकडे बोट दाखवायला नको.

निवडणूक आयोगाचेही कर्तव्य आहे की, ईव्हीएमच्या बाबतीत ते तांत्रिकदृष्ट्या किती सुरक्षित आहे याचा युक्तिवाद करत बसण्यापेक्षा जे गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत, उदाहरणार्थ, उमेदवारांना त्यांच्या घरातलीच मतेही न मिळणे, प्रत्यक्ष मतदानापेक्षा निकालात मिळालेली मतांची आकडेवारी याकडे त्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. विरोधी पक्षांना संधी मिळाली तर ते शंका घेणारच आणि शंका उपस्थित केली गेली की संशय कल्लोळ होणारच. जगातील अनेक देशांनी ईव्हीएम नाकारले आहे ही बाब सत्य आहे. तथापि, भारताने तो मार्ग पत्करलेला नाही. मतमोजणीसाठी लागणारा वेळ आणि प्रचंड लोकसंख्या ही मतपत्रिकेला विरोध करण्यामागची कारणे सांगण्यात आली आहेत, तर्क किंवा वास्तव माणून आयोगाचे म्हणणे मान्य केले, तरी लोकशाही प्रक्रियेत गंभीर प्रश्न सातत्याने उभे राहत आहेत, त्याकडे दुर्लक्ष कसे करता येईल.

# नवीन मुख्यमंत्र्यांची शपथ किती दिवसांत घेणे बंधनकारक?

**मुंबई । प्रतिनिधी**

**सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता आशिष पांडे यांनी सांगितले की, निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर किती दिवसांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणे बंधनकारक आहे. याबाबत भारतीय राज्यघटनेत कोणताही स्पष्ट नियम नाही, परंतु विधानसभेचा कार्यकाळ ५ वर्षांचा असतो. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात संपत आहे.**

राज्यातील विधानसभा निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर एका आठवड्यात साधारणपणे मुख्यमंत्र्याच्या नावाची घोषणा केली जाते. किंवा शपथ घेण्याची प्रक्रियाही पूर्ण होते. अधिवक्ता आशिष पांडे यांनी सांगितले की, जर कोणत्याही पक्षाने सरकार स्थापनेचा दावा केला नाही, तर राज्यपाल सर्वाधिक मते मिळविणाऱ्या पक्षाला सरकार स्थापन करण्यास सांगतात. जर सर्वाधिक मते मिळविणारा पक्षही राज्यात सरकार स्थापन करू शकत नसेल, तर राज्यपाल दुसऱ्या क्रमांकाच्या मोठ्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करू शकतात.

### राज्यपालांना कोणते अधिकार?

राज्यात सरकार स्थापनेला विलंब होत असेल तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करण्याचा अधिकार राज्यपालांना असतो. अशा परिस्थितीला 'राज्य आणीबाणी' किंवा 'संवैधानिक आणीबाणी' असेही म्हणतात. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५६ मध्ये असे म्हटले आहे की, जेव्हा राष्ट्रपती, राज्यपालांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर किंवा राज्याचे सरकार घटनेच्या तरतुदींनुसार चालवले जात नसेल तर राष्ट्रपती राजवट लागू केली जाते. सुरुवातीच्या टप्प्यात राष्ट्रपती राजवट ६ महिन्यांसाठी वैध असते, परंतु आवश्यक असल्यास ती ६ महिन्यांपासून जास्तीत जास्त ३ वर्षांपर्यंत वाढवता येते. महाराष्ट्रात सध्या तशी स्थिती नसली तरी लवकरच सरकार स्थापन होण्याची शक्यता आहे. येत्या दोन दिवसांत मुख्यमंत्र्यांचे नाव जाहीर केले जाईल आणि त्यानंतर ५ तारखेला शपथविधी होईल असा दावा केला जातोय. एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारायला तयारी नाहीत. त्यांना गृहमंत्रीपद हवं आहे असं देखील बोललं जातंय. पणदेवेंद्र फडणवीसहे मुख्यमंत्री होतील हे जवळपास निश्चित झालंय. राष्ट्रवादीकडून अजित पवार पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री होणार आहेत.

### शिंदे गटाच्या वाट्याला किती मंत्रिपदं?

समोर आलेल्या माहितीनुसार येत्या पाच ५ डिसेंबर रोजी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी होणार आहे. मात्र त्यापूर्वी महायुतीच्या गोटात घडामोडींना वेग आला आहे. एकनाथ शिंदे हे त्यांच्या साताऱ्यातील दरे या गावी रवाना झाले आहेत. पुढील दोन दिवस महायुतीच्या कोणत्याही बैठका होणार नाहीयेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाला बारा ते तेरा मंत्रिपदं मिळण्याची शक्यता आहे. मात्र एकनाथ शिंदे हे गृहखात्यावर अडून बसले आहेत. गृहखातं मिळालं तरच ते उपमुख्यमंत्रिपद स्विकारणार असल्याची माहिती समोर येत आहे. अन्यथा उपमुख्यमंत्रिपद शिवसेनेथील एखाद्या दुसऱ्या वरिष्ट नेत्याला मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे भाजप देखील गृहखात्यासाठी अग्रही आहे, भाजप देखील गृहखातं सोडण्यास तयार नाही, त्यामुळे अशा स्थितीमध्ये एकनाथ शिंदे यांना गृहखातं मिळणार का? नाही मिळाल्यास उपमुख्यमंत्रिपद शिवसेनेच्या कोणत्या वरिष्ठ नेत्याला मिळणार याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

# इफ्फी, गोवा येथे राज कपूर यांची शताब्दी विशेष सत्रातील रणबीर कपूरच्या उपस्थितीसह साजरी

**बीड । प्रतिनिधी**

प्रख्यात अभिनेते आणि दिग्दर्शक राज कपूर यांच्या शताब्दी समारंभाचा एक भाग म्हणून, ५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) राज कपूर यांचे नातू रणबीर कपूर आणि ज्येष्ठ चित्रपट निर्माते राहुल रवैल यांनी एका विशेष सत्रात उपस्थित राहून या कलाश्रेष्ठाला आदरांजली वाहिली. हे सत्र म्हणजे राज कपूर यांचे भारतीय चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदान, त्यांचा चिरस्थायी प्रभाव आणि त्यांच्या कलाकृतींचा उच्च वारसा यांचा आकर्षक धांडोळा होता. रणबीर कपूर यांनी त्यांच्या आजोबांचा विलक्षण प्रभाव विशद करून राज कपूर यांचे चित्रपट काळ आणि सीमा ओलांडतात, हे अधोरेखित केले. आवारा, मेरा नाम जोकर आणि श्री ४२० यांसारख्या चित्रपटांची सार्वत्रिक मोहिनी कशी होती, ते रशियापासून भारतापर्यंत जगभरातील प्रेक्षकांमध्ये खोलवर कसे रुजले यावर त्यांनी स्पष्ट केले. राज कपूर यांच्या चित्रपटांच्या प्रासंगिकतेवर प्रकाश टाकत, रणबीर यांनी आवाराच्या संकल्पनेने जातीवादाचा कसा वेध घेतला, हे नमूद केले तर श्री ४२० हा लोभ आणि महत्त्वाकांक्षेचे विषय हाताळण्यात मध्ये गुंतला होता, प्रेमरोग आणि राम तेरी गंगा मैली यांसारख्या नंतरच्या चित्रपटांची स्त्रियांच्या समस्या आणि सामाजिक आव्हानांवरील नैतिक कथनांसाठी प्रशंसा करण्यात आली, ज्यामुळे काळाच्या पुढे असलेला चित्रपट निर्माता म्हणून राज कपूर यांचा दृष्टिकोन अधोरेखित केला गेला. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (एनएफडीसी), भारतीय राष्ट्रीय चित्रपट अर्काईव्ह्ज (एनएफएआय) आणि फिल्म हेरिटेज फौंडेशन या संस्थांच्या सहकार्याने राज कपूर यांच्या चित्रपटांचे पुनर्संचयन करण्याच्या प्रयत्नांची देखील रणबीर कपूर यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की राज कपूर यांचे दहा चित्रपट याआधीच पुनर्संचयित केलेले असून डिसेंबर २०२४ मध्ये भारतभरात ते प्रदर्शित करण्याचे नियोजन सुरु आहे. भारतीय चित्रपटसृष्टीची पायाभरणी करण्यात राज कपूर यांनी दिलेल्या योगदानाचा सन्मान करत, राज कपूर यांची चित्रपटीय प्रतिभा जतन करण्याच्या तसेच त्याचा उत्सव साजरा करण्याच्या महत्त्वावर रणबीर कपूर यांनी अधिक भर दिला. या सत्रामध्ये चित्रपट निर्मिती, अभिनय आणि सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यात चित्रपटांची विकसित होत गेलेली भूमिका यासंदर्भातील चर्चेचा देखील समावेश होता.पिता झाल्यानंतर पर्यावरण आणि सामाजिक बदलांप्रती आपण अधिक जागरूक झालो असे सांगताना रणबीर कपूर यांनी कलाकारांना त्यांचे मंच जागतिक कल्याणासंदर्भात ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आणि त्याचे समर्थन करण्यासाठी वापरावेत असे आवाहन केले. जगभरातील महान कलाकारांकडून प्रेरणा घेऊन स्वत:ची वेगळी अशी शैली विकसित करण्यासाठी नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देऊन रणबीर यांनी अभिनयात स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असण्याचे महत्त्व अधोरेखित केले.सत्राच्या शेवटी, रणबीर कपूर यांनी हा आदरांजलीपर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल इफ्फीप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि उपस्थित प्रेक्षकांना राज कपूर यांच्या चिरंतन कार्याचा आनंद घेऊन त्याचे हृदयात जतन करण्याचे आवाहन केले. रणबीर याने व्यक्त केलेल्या विचारांना दुजोरा देत राहुल रवैल यांनी चित्रपट सृष्टीवरील तसेच समाजावरील राज कपूर यांच्या कायमस्वरूपी प्रभावाचा उल्लेख केला. या सत्रात केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभाग सचिव संजय जाजू, सुप्रसिध्द भारतीय चित्रपट निर्माते आणि इफ्फीचे महोत्सव संचालक शेखर कपूर, केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभागाचे संयुक्त सचिव आणि एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रीथूल कुमार आणि केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभागातील चित्रपट विभागाच्या संयुक्त सचिववृंदा देसाई यांनी भाग घेतला.

# वाढीव मतदानाचे पुरावे द्या!

## नाना पटोलेंचे निवडणूक आयोगाला पत्र, एका दिवसात तब्बल ९ लाख ९९ हजार ३५९ मतांची वाढ कशी झाली?



**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीत घोटाळा झाल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार २० नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजेपर्यंत ६५.२ टक्के मतदान झाले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता जाहीर केलेली अधिकृत आकडेवारी ६६.५ टक्के होती, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. निवडणूक आयोगाने स्वत: अधिकृतरित्या जाहीर केलेल्या आकडेवारीत १.०३ टक्क्यांची तफावत कुठून आली? असा सवाल नाना पटोले यांनी पत्राद्वारे केला आहे.**

पटोले म्हणाले, निवडणूक आयोगाने जाहीर केलेली मतांची आकडेवारी पाहता मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजल्यानंतर मतदान केंद्रावर लांबच लांब रांगा लागल्या असल्या पाहिजेत. राज्यातील किती मतदारसंघावर संध्याकाळी ५ नंतर मतदारांच्या लांब रांगा लागल्या होत्या? याचे व्हिडीओ चित्रीकरणासह पुरावे निवडणूक आयोगाने जाहीर करावेत, अशी मागणीही नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. मतांच्या टक्केवारीतील तफावत पाहता हा प्रकार गंभीर व चिंताजनक वाटत आहे. मतांच्या या वाढीबद्दल जनतेच्या मनातच शंका उपस्थित होत असतील तर त्या दूर करणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. निवडणूक आयोगाने स्वतः पुढे येऊन आपली भूमिका पुराव्यासह स्पष्ट करावी आणि जनतेच्या मनातील शंकांचे समाधानकारक उत्तर द्यावे, असे या पत्रात नाना पटोले यांनी म्हटले आहे. आता पटोलेंच्या मागणीवर निवडणूक आयोग काय निर्णय घेणार? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. एका दिवसात तब्बल ९ लाख ९९ हजार ३५९ मतांची वाढ कशी झाली? असा सवाल देखील नाना पटोलेंनी उपस्थित केला आहे.

### काँग्रेसचे निवडणूक आयोगाला प्रश्न

१) प्रत्येक मतदाराला मतदान करण्यासाठी साधारण १ मिनिटाचा वेळ लागतो. याप्रमाणे मतदानाची अंतिम टक्केवारी आणि लागलेला वेळ याची सांगड का बसत नाही?, २) रात्री उशिरापर्यंत झालेल्या मतदानाची छायाचित्रे आणि व्हिडिओ फुटेज निवडणूक आयोगाने का प्रसिद्ध केले नाही?, ३) राज्यातील कोणकोणत्या मतदान केंद्रावर रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू होते?, ४) मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यासाठी एवढा वेळ का लागला?, ५) निवडणूक पार पडल्यानंतर आयोगाने पत्रकार परिषद घेऊन आकडेवारी विस्तृत का जाहीर केली नाही?

## पान १ वरून...

### बोगस बियाणे, बनावट खत

शेतकऱ्यांचे त्यातून नुकसान होते. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आवश्यक ते पाऊल उचलण्यावर बैठकीत चौहान यांच्याकडून भर देण्यात आला. त्यासाठी अधिकाऱ्यांना उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी दिले. बोगस बियाणे आणि बनावट खत, किटकनाशकांशी संबंधित कायदे करण्याचा अधिकार राज्य सरकारचा आहे. त्यामुळे राज्य सरकारांशी याबद्दल चर्चा करण्यात येईल, असेही चौहान म्हणाले.

------------

### पवार, ठाकरेंना महायुतीत

भाजपला बसू शकतो, असे म्हटले जात आहे. राज्यातील विचित्र परिस्थितीत शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांना सोबत घेतले तर महायुती सरकारला पाच वर्ष कसल्याही अडथळ्याविना काम करता येऊ शकते. त्यासाठी शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांना महायुतीत घेऊन त्यांना सरकारमध्ये सहभागी करायचे, अशी खेळी भाजप नेतृत्वाची असल्याची विश्वसनीय सुत्रांची माहिती आहे. त्यासाठी पवार आणि ठाकरे यांचे मने वळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु असल्याचेही म्हटले जात आहे. तसे झाले तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार काय भुमिका घेतात? याकडे सर्वांचे लक्ष आहे. दरम्यान गेल्या काही दिवसापासून एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत घेतलेल्या भुमिकेमुळे भाजप हा वेगळा डाव टाकत असल्याची चर्चा आहे.

-----------

### माकेगाव शिवारात

यांच्या बैलाचा फडशा पाडला आहे. त्यामुळे देशमुख यांचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बिबट्या दिसताच वनविभागाला कल्पना द्यावी, असं आवाहन केले आहे. त्यासोबतच ग्रामस्थांनी शेतात जाताना सतर्कता बाळगण्याचेही आवाहन त्यांनी केले आहे.

-----------

### श्रीक्षेत्र नारायणगड संस्थानच्या

मंडळाच्या बैठकीमध्ये सर्वानुमते जगद्गुरु तुकोबाराय संस्थान मादळमोहीचे मठाधिपती ह.भ.प.श्री.संभाजी महाराज यांची निवड करण्यात आली आहे. निवडीबद्दल त्यांचे श्रीक्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती महंत श्री.शिवाजी महाराज व संस्थांनच्या सर्व विश्वस्त मंडळींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्रात धाकटी पंढरी म्हणून श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाची ओळख आहे. वैकुंठवासी संत कुलभूषण महात्मा श्री नगदनारायण महाराजांच्या पदस्पर्शाने व कार्याने पावन व सिद्ध झालेल्या श्रीक्षेत्र नारायणगड या संस्थांनची अध्यात्मिक व वारकरी कार्यातून ओळख उभ्या महाराष्ट्र व देशाच्या विविध राज्यांमध्ये सर्व दूर पसरलेली आहे. श्रीक्षेत्र नारायणगड संस्थांनचा कालखंड साडेतीनशे वर्षांपेक्षा जास्त असून आतापर्यंत आठ मठाधिपतींनी त्यांच्या हयातीमध्ये वारकरी,आध्यात्मिक कार्य व समाज प्रबोधन करून आपले सर्वस्व अर्पण करून श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाच्या आध्यात्मिक आणि धार्मिक,परंपरेला एका उंचीवर पोहोचविलेले आहे. विद्यमान महंत ह भ प मठाधिपती श्री. शिवाजी महाराज हे श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे नववे मठाधिपती असून समाजाच्या उद्धारासाठी धार्मिक, संप्रदायिक कार्यातून ते आपले सर्वतोपरी समर्पण व योगदान देत आहेत. त्यांच्या कार्यकाळामध्ये श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाच्या आध्यात्मिक क्षेत्रातील व वारकरी परंपरेतील समाज प्रबोधन श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाला सर्वांगीण विकासाच्या उंचीवर नेण्याच्या दृष्टीने कार्याला एक वेगळी झळाळी आणि दिशा मिळालेली आहे. धार्मिक,आध्यात्मिक कार्याला सामाजिक व प्रशासकीय भूमिकेम बरोबरच श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे व्यवस्थापन करण्यासाठी विश्वस्त मंडळाची स्थापना झालेली असून अकरा लोकांच्या विश्वस्त मंडळ कमिटीमध्ये विश्वस्थाची एक जागा रिक्त होती त्या रिक्त जागी मादळमोही येथील जगद्गुरु तुकोबाराय संस्थांनचे मठाधिपती,नारायणगडाचे नि:श्चिम भक्त व नारायणगडाचे मठाधिपती महंत श्री शिवाजी महाराज यांचे पट्टशिष्य ह.भ.प.श्री.संभाजी महाराज यांची नारायणगडाच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीमध्ये सर्व विश्वस्तांच्या सहमतीने निवड करण्यात आली आहे. ह.भ.प.श्री.संभाजी महाराज हे आळंदी येथील जोग महाराज स्थापित वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी असून त्यांनी वारकरी, अध्यात्मिक शिक्षणाचे ज्ञान घेतलेले आहे. तसेच गेली बारा वर्षापासून ते मादळमोही येतील जगद्गुरु तुकोबाराय संस्थांनचे मठाधिपती म्हणून अध्यात्मिक/वारकरी संप्रदायाचे उत्तम रीतीने प्रवचन,भजन, कीर्तनातून समाज प्रबोधनाचे काम करत आहेत. आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचा गाढा अभ्यास व त्यांची संप्रदायावर असणारी पकड, श्रीक्षेत्र संस्था नारायणगडावर असणारी श्रद्धा, प्रेम व नारायणगडाचे असणारे निस्सीम भक्त म्हणून त्यांची श्रीक्षेत्र संस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा नारायणगडाचे मठाधिपती महंत श्री शिवाजी महाराज, संस्थांनचे सर्वश्री विश्वस्त माजी आमदार राजेंद्र जगताप, बीडचे माजी नगराध्यक्ष दिलीपराव गोरे, प्रा. जनार्दन शेळके, ॲड. महादेवराव तुपे, अनिलराव जगताप, भानुदास जाधव, राजेंद्र मस्के,बळीराम गवते, गोवर्धन काशीद या सर्व विश्वस्त मंडळींनी श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडच्या विश्वस्त मंडळ कमिटीमध्ये रिक्त असलेल्या पदावर विश्वस्त म्हणून निवड करून संप्रदायिक, धार्मिक,अध्यात्मिक गोष्टीच्या माध्यमातून समाज प्रबोधनाबरोबरच श्रीक्षेत्र संस्थान गडावर सामाजिक व प्रशासकीय काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली.

---------------

### जितेंद्र आव्हाडांनी घेतली एकनाथ

देखील मुख्यमंत्री आणि खातेवाटपावरून नाराजी नाट्य सुरू असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. शिवसेनेने गृह खात्यावर दावा केला आहे. मात्र, अद्याप भाजपाकडून या दाव्यावर अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. दरम्यान, गुरूवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर राज्यातील महायुतीच्या प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. त्यानंतर एकनाथ शिंदे हे अचानक आपल्या मूळ गावी गेल्याने महायुतीची शुक्रवारची बैठक रद्द करण्यात आल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. एकनाथ शिंदे हे त्यांच्या गावी जाण्याआधी जितेंद्र आव्हाड यांनी वर्षा या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली आहे. मात्र या दोन्ही नेत्यांच्या भेटीचे कारण गुलदस्त्यात आहे.

--------------

### संसदेच्या दोन्ही सभागृहांचे

विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभा आणि राज्यसभेत कामकाज होऊ शकले नाही. दोन्ही सभागृहाचे कामकाज २ डिसेंबर रोजी, सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

---------

### एकनाथ शिंदे यांनी वक्फ बोर्डाला

निकाल जाहिर झाल्यानंतर नुकताच राज्याच्या अल्पसंख्याक विभागाने १० कोटी रूपये वक्फ बोर्डाला देण्यात येत असल्याचा जीआर अर्थात शासन निर्णय जारी केला. मात्र देवेंद्र फडणवीस आणि भाजपाने त्यावर आकांड तांडव केल्याने राज्याच्या मुख्य सचिवांनी अखेर हा जीआरच रद्द केल्याचे समोर आले आहे. निवडणूकीच्या आधी मुस्लिम मतदारांना खुष करण्यासाठी १० कोटी रूपये देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला होता. तसेच त्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही त्यास होकार देत महायुतीचे सरकार सर्वांना घेऊन चालणारे असल्याचे जाहिर केले होते. मात्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला निर्णय एकनाथ शिंदे हे पुन्हा मुख्यमंत्री पदावर येत नाहीत म्हणून त्यांचा निर्णय अशा पद्धतीने फिरविला जाणे म्हणजे महायुतीत मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयावरही एकमत नव्हते असे स्पष्टपणे दिसून येत आहे. अल्पसंख्याक विभागाने निवडणूकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर १० कोटी रूपयांचा निधी वक्फ बोर्डाला देण्याचा शासन निर्णय जाहिर केल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर एक पोस्ट लिहिली असून राज्यात काळजीवाहू सरकार असताना वक्फ बोर्डाला निधी देण्यासंदर्भात प्रशासनाने अशा पद्धतीचा जीआर जारी करणे योग्य नसल्याचे सांगत मुख्य सचिवांनी हा शासन निर्णय मागे घेतला. राज्यात नवीन सरकार येताच याची चौकशी केली जाईल अशी घोषणाही यावेळी केली. तर भाजपाने याप्रकरणी स्पष्टीकरण देत प्रशासनाने वक्फ बोर्डाला १० कोटी देण्याचा घेतलेला निर्णय हा परस्पर घेतला. मात्र वक्फ बोर्डाला राज्यघटनेत स्थान नाही यावर भाजपा ठाम राहणार असून भाजपा नेत्यांच्या विरोधामुळे हा निर्णय मागे घेत रद्द करण्यात आल्याचेही यावेळी सांगितले.

-------

cmyk

## रविवारी गायन अन् तबलावादनाची मैफल रंगणार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या एनएससी म्युझिक अकॅडमीच्या वतीने ज्येष्ठ गायक भरत अण्णा लोळगे यांच्या गायनाचे आणि ज्येष्ठ तबलावादक प्रकाश मानूरकर यांच्या एकल तबलावादनाचे आयोजन करण्यात आले आहे कार्यक्रम रविवार दि.१ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

बीड शहरातील सहयोगनगर भागात तरुण तबलावादक नरहरी अर्जुन दळे आणि वारकरी संप्रदायातील गायक सुग्रीव महाराज डाके यांनी नव्यानेच संगीताचे शिक्षण देणार्या विद्यालयाची स्थापना केली आहे. या विद्यालयात गायन, हार्मोनियम, वादन, आणि तबला वादनाचे प्रशिक्षण दिले जाते आहे . प्रत्येक महिन्याला नियमितपणे गायन आणि वादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन देखील केले जात असून याच कार्यक्रमाचा भाग म्हणून रविवार दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता ज्येष्ठ गायक भरतअण्णा लोळगे यांचे गायन होणार आहे, त्यांना हार्मोनियमवर सुदर्शन धुतेकर, तबल्यावर नरहरी दळे हे साथसंगत करणार आहेत. तसेच तबलावादक प्रकाश मानूरकर यांना हार्मोनियमवर 'लहरा-संगत' सुदर्शन धुतेकर हे करणार आहेत. शहरातील रसिक श्रोत्यांनी कार्यक्रमास आवर्जून एनएससी म्युझीक ॲकॅडमी, गजानन महाराज मंदिर शेजारी, सहयोगनगर, बीड येथे या संगीतसभेत उपस्थित राहावे असे आवाहन नरहरी दळे आणि सुग्रीव महाराज डाके यांनी केले आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. ३० नोव्हेंबर २०२४




# यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचा शानदार समारोप

## यशवंतराव चव्हाण यांनी सर्वच क्षेत्रात केलेले काम आज ही दिशादर्शक -कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांचे मत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक, राजकीय, साहित्य, औद्योगिक, सांस्कृतिक आणि इतर सर्वच क्षेत्रात केलेले काम आज दिशादर्शक आहे असे मत डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी व्यक्त केले. येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या समारोपीय भाषणात डॉ. पी. डी. पाटील बोलत होते. यावेळी पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते सचिन इटकर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई चे दत्ता बाळ सराफ हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर मान्यवर अतिथींसोबत मा. विजय अण्णा बोराडे (कृषी), या. बाबा भांड (साहीत्य), पद्मश्री पं. सतीष व्यास (संगीत) आणि देविदास सौदागर (युवा गौरव) हे चार पुरस्कार मुर्ती यांच्या सह यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचीव दगडू लोमटे हे उपस्थित होते.

आपल्या विस्तारीत भाषणात पुढे बोलतांना डॉ. पी. डी. पाटील पुढे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांचे निधन १९८४ साली झाले आणि त्यानंतर यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचा हा कार्यक्रम १९८५ साली भगवानराव लोमटे यांनी हा समारोह सुरु केला. गेली ४० वर्षे हा समारोह आज ही अव्याहतपणे सुरु आहे यांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे.

यशवंतराव चव्हाण यांचे कार्य सर्व क्षेत्रात होते. राज्यातील सामाजिक, राजकीय, साहित्य, कृषी, सांस्कृतिक, औद्योगिक किंवा इतर असे एक ही क्षेत्र नाही ज्या क्षेत्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे कार्य केले नाही. यशवंतराव चव्हाण यांनी केलेले हे कार्य आज ही दिशादर्शक ठरणारे काम आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जपण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास मला अध्यक्ष म्हणून उपस्थित राहता आले हे माझं भाग्य आहे असे त्यांनी सांगितले.आपल्या भाषणात त्यांनी पुरस्कार प्राप्त विजय अण्णा बोराडे, बाबा भांड, पं. सतीष व्यास आणि देविदास सौदागर यांचे कार्य आता मराठवाड्यापुरतेच मर्यादित राहिले नाही तर ते आता महाराष्ट्रालाही दिशादर्शक ठरणार आहे असे त्यांनी सांगितले.

देविदास सौदागर यास ५ लाखांची भेट

या कार्यक्रमात युवा साहित्यिक म्हणून ज्यांचा गौरव करण्यात आला त्या देविदास सौदागर यांनी उच्च शिक्षण घेऊन ही ते आपल्या कुटुंबियांच्या उपजिवेकेसाठी शिलाई मशीन वर कपडे शिवण्याचे काम करीत आहेत. त्यांना या परस्थितीतुन बाहेर येण्यासाठी व त्यांची साहित्य सेवा विकसीत करण्यासाठी ५ लाख रुपये भेट देणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले.

अंबाजोगाई शहरात गेल्या ३९ वर्षापासून यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जपण्यासाठी, त्यांच्या विचारांची जपवणुक या तीन दिवसीय स्मृती समारोहाची सुरु करण्याचे काम ही एक चळवळ आसून या कामाचे कौतुक डॉ. पी. डी. पाटील करुन स्मृती समितीला शुभेच्छा देवून संयोजकांचे कौतुक केले. या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई चे दत्ता बाळ सराफ यांनी आपल्या भाषणात

यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तीन दिवसीय समारोह साजरा करणारा हा एकमेव कार्यक्रम आहे, त्यामुळे हा कार्यक्रम




आयोजित करणारे दगडू लोमटे व त्यांच्या सर्व सहका-यांचे मनापासून कौतुक करावे तेवढे कमी आहे. खरं तर यशवंतराव चव्हाण यांनी स्वतः एकही संस्था उभी केली नाही मात्र त्यांच्या नावाने अनेक संस्था उभी करणारी हजारो माणसं त्यांनी उभी केली.

पं जवाहरलाल नेहरु यांच्या सारखा देशाला पहिला पंतप्रधान आणि यशवंतराव चव्हाण यांच्या सारखा पहिला मुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळणे यांच्या सारखी भाग्याची गोष्ट नाही. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी गेली ४० वर्ष सुरू असलेल्या हा समारोह असाच अविरत सुरू रहावा अशा शुभेच्छा दत्ता बाळ सराफ यांनी दिल्या.

पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक सामाजिक कार्यकर्ते सचिन इटकर यांनी आपल्या मनोगतात बोलताना सांगितले की, एखाद्या महापुरुषांच्या स्मृती जपण्याची परंपरा असलेल्या असे कार्यक्रम फार कमी आहेत. माझे शिक्षण कराड येथे यशवंतराव चव्हाण यांनी सुरु केलेल्या औषधशास्त्र महाविद्यालयात झाले. त्यामुळे यशवंतराव चव्हाण, वेणुताई चव्हाण यांच्या कार्य समाजातून घेतले आणि चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याची माहिती देण्यासाठी अमेरिकेमध्ये ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांची सहा भाषणं आयोजित करण्याची संधी मला मिळाली. याचा मला खुप आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा खरा वारसा चालवण्याचे काम मराठवाड्याने केला असल्याचे त्यांनी सांगून यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जपणा-या या महाराष्ट्रातील एकमेव कार्यक्रमाच्या आयोजना बद्दल संयोजकांना धन्यवाद दिले.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सचीव दगडू लोमटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक त्यांनी या समारोहाची सुरवात ३९ वर्षापुर्वी या समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व.श्री. भगवानरावजी लोमटे उर्फ बापू, भगवानराव शिंदे व त्यांच्या सहका-यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार तथा पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरराव चव्हाण यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी केली. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या निर्मिती साठी यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणाऱ्या साहित्य, कला-संगीत, कृषी आणि युवा शक्ती यांची सांगड घालत यासर्व बाबींची माहिती या तीन दिवसीय यशवंराव चव्हाण स्मृती समारोहात दिली. यापुर्वी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील अनेक मान्यवर विचारवंतांनी आपली हजरी लावली असून या वर्षीच्या समारोहाच्या उद्धाटन कार्यक्रमास गांधीवादी विचारवंत तुषार गांधी आणि सिनेअभिनेते किरण माने यांनी उपस्थिती लावली तसेच कवी संमेलन, बाल आनंद मेळावा, सुफी व गजल गायन मैफील, शेतकरी परीषद या सर्व कार्यक्रमास तसेच या समारोपीय कार्यक्रमास डॉ. पी. डी. पाटील, सामाजिक सचिन ईटकर, पुरस्कार प्राप्त अतिथींनी उपस्थित राहुन हा समारोह यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे ऋण व्यक्त केले आणि याचा आपणास मनस्वी आनंद होतो आहे असे त्यांनी सांगितले.

या समारोपीय समारंभात मराठवाड्यातील कृषी, साहित्य, संगीत व युवा या क्षेत्रातील चार गुणवंतांचा यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने पुरस्कार देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यात जालना येथील विजय अण्णा बोराडे यांना ''कृषी'', छत्रपती संभाजी नगर येथील बाबा भांड यांना यांना ''साहित्य'', मुंबई (मुळ रा. तेर) येथील पद्मश्री पं. सतीश व्यास यांना ''संगीत'' तर तुळजापूर येथील लेखक तथा २०२४ चा साहित्य अकादमी युवा पुरस्काराने गौरवलेले देविदास सौदागर यांना ''युवागौरव'' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या चार ही पुरस्कार मुर्तींचा प्रत्येकी स्मृतीचिन्ह, रोख अकरा हजार रूपये, शाल, पुष्पहार देवून गौरव करण्यात आला. यावेळी विजय अण्णा बोराडे, पं. सतीश व्यास, देविदास सौदागर आणि बाबा भांड यांनी आपल्या सत्काराबध्दल ऋण व्यक्त करणारे मनोगत ही व्यक्त केले.

या तीन दिवसीय समारोहात चित्रकार आणि धान्य रांगोळी प्रदर्शनी भरवणारे प्रल्हाद ठक, अंबाजोगाई येथील हौशी छायाचित्रकारांचा समुह ' विहंगम भोवताल' यांच्या सदस्यांचे पक्षी व फुलपाखरू छायाचित्रांचे प्रदर्शन, गव्हाच्या काड्या पासून रंगीत चित्रांचे प्रदर्शन, पुस्तक विक्री व प्रदर्शन, कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या समारोहस्थळी या वेगवेगळ्या प्रदर्शनी भरवणा-या सर्वांचा समारोह समितीच्या वतीने स्मृती चिन्ह देवून गौरव करण्यात आला.

कै.भगवानरावजी लोमटे यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या या समारोहाचे महाराष्ट्रभर कौतुक होत आलेले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात पोहचलेल्या या समारोहास रसिक श्रोत्यांनी तिन्ही दिवस उपस्थित उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल समारोहाचे सचीव दगडू लोमटे, भगवानराव शिंदे बप्पा, प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे, सतीश लोमटे व राजपाल लोमटे यांनी रसिक श्रोत्यांचे आभार मानले.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवर अतिथींचे स्वागत यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे कोषाध्यक्ष सतीश लोमटे यांनी तर पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे स्वागत समितीचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. मेघराज पवळे यांनी मानले.

संगीत, संतूर वादन व शास्त्रीय गायनाने समारोपाचा समारोप

२५-२६ आणि २७ नोव्हेंबर अशी सलग तीन दिवस चालणाऱ्या या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचा समारोप रात्री शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत स्व. पं. शिवकुमार शर्मा यांचे शिष्य पद्मश्री पं. सतीश व्यास यांचे संतूर वादनाने झाला. त्यांना तबल्यावर पं. आदित्य कल्याणपूर यांनी साथ दिली. त्यानंतर कोलकत्ता येथील प्रतिभावान शास्त्रीय संगीत गायक उस्ताद अर्शद अली खान यांचे गायन झाले. त्यांना पुणे येथील प्रसिद्ध तबलावादक प्रशांत पांडव व संवादिनीवर उदय कुलकर्णी पुणे यांनी साथ दिली. या संगीत मैफलीत रसिक श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# काकाचा खून केल्याप्रकरणी पुतण्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील शिराढोण गावच्या शिवारात ६० वर्षीय जालना पीपल्स बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी तथा शेतकरी यांचा मृतदेह आढळून आल्याने एकच एकच खळबळ उढावली होती मयत मच्छिंद्र गंगाधर सपकाळ ( रा. शिराढोण तालुका अंबड, हल्ली मुक्काम अंबड) असे मृताचे नाव असून अंबड पोलिसांनी घटनेचा तपास लावून अखेर आरोपीला पकडण्यात यश आले याप्रकरणी अंबड पोलिसांना बारक्याने तपास करावा लागला. या घटने प्रकरणी सविस्तर माहिती अशी की सख्ख्या पुतण्या ज्ञानेश्वर दशरथ सपकाळ यांनी त्यांचा काका मच्छिंद्र गंगाधर सपकाळ यांचा खून केला याबाबत पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी दिलेली आरोपी ज्ञानेश्वर सपकाळ यांचे लग्न झाले होते परंतु पत्नी दोन वर्षानंतर सोडून गेली व तसेच ज्ञानेश्वर यांनी नंतर दुसरा लग्न केलं नंतर संसार चांगला सुरळीत सुरू होता. पण मच्छिंद्र व ज्ञानेश्वर यांच्यामध्ये काही घरगुती कारणामुळे वाद झाला होता त्या वादातून पुतण्या ज्ञानेश्वर यांनी काका मच्छिंद्र सपकाळ यांचा खून केला . याप्रकरणी पोलिसांनी आरोपी ज्ञानेश्वर सपकाळ याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली व आज न्यायालयामध्ये हजर केले असता आरोपीला २ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

अंबड येथील रहिवाशी मच्छिंद्र सपकाळ यांची शिराढोण येथे शेती आहे. बुधवारी सायंकाळी ते शेतातील काम आटोपून अंबड येथील घराकडे परत निघाले. मात्र, रात्री उशीर झाला तरीही ते घरी परतले नाही. यामुळे नातेवाइकांनी त्यांचा लागलीच शोध सुरू केला. अंबड ते शिराढोणकडे मार्गावर शोध घेत असताना नातेवाइकांना रात्री उशिरा शिराढोण शिवारातील पाणंद रस्त्यावर सपकाळ यांचा मृतदेह आढळून आला. सपकाळ यांचा चेहरा लाकडी ओंडक्याच्या सहाय्याने ठेचल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी मृताच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सतीश जाधव हे करत आहेत.


पोलीस निरीक्षक श्री. सतिष जाधव यांनी आपले अधिनीस्त अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करुन तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी / अंमलदार यांनी सदर प्रकरणात घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्ह्याच्या तपासाच्या संबंधाने गुन्ह्यातील आरोपी ज्ञानेश्वर दशरथ सपकाळ वय-३२ वर्ष रा. शिराढोण ता. अंबड जि. जालना यांस चौकशीच्या अनुषंगाने ताब्यात घेतले असता, त्याने गुन्ह्याची कबुली देवुन सांगितले की, यातील मयत यांनी आरोपीचे पहिले लग्न मोडले त्यामुळे आरोपीचे भरपाईपाई करणेसाठी मोठे आर्थीक नुकसान झाले, तसेच मयत यांनी आरोपीच्या आईला मारहाण केल्याचा जुना राग मनात धरुन आरोपीने मच्छिंद्र सपकाळ यांना लाकडी दांडुक्याने डोक्यात मारुन खुन केला आहे. यातील ताब्यात घेतलेल्या आरोपीने गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे .

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अंबड उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विशाल खांबे यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. चे अधिकारी पो.नि. पंकज जाधव, अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री सतिष जाधव, सपोनि/अमोल गुरले, पोउपनि / राजेंद्र वाघ, पोउपनि / छोटूराम ठुबे, पोउपनि / भगवान नरोडे, पोहेका विष्णु चव्हाण, दीपक पाटील, सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पहुरे, लक्ष्मीकांत आडेप, सागर वाविस्कर, दत्ता वाघुंडे, देविदास भोजणे, पो.अं./ संजय क्षिरसागर, स्वप्निल भिसे, देवा डेहंगळ, अरुन मुंढे,, अक्रूर धांडगे, भागवत खरात, कैलास चेके आदींनी ही कारवाई केलेली आहे.

# वडवणी येथे मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मराठी पत्रकार परिषद स्थापना दिनानिमित्त वडवणी मध्ये पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशाने आणि मराठी पत्रकार परिषद सलग्न डिजिटल मीडिया परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी आणि डॉ.विजयकुमार निपटे यांच्या मयुरेश्वर रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने येत्या ३ डिसेंबर २०२४ रोजी वडवणी येथील पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत बीड परळी हायवे रोडवर असलेल्या मयुरेश्वर हॉस्पिटल येथे ठेवण्यात आले असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी यांच्या वतीने देण्यात आली




आहे.

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभरात ३ डिसेंबरला दरवर्षी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येते. या शिबीरात पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांची आरोग्य तपासणी केली जाते. या वर्षी वडवणी येथील डॉ विजयकुमार निपटे यांच्या मयुरेश्वर हॉस्पिटल मध्ये

**मयुरेश्वर हॉस्पिटलमध्ये होणार**

१० ते २ या वेळेत होणार आहे. या शिबीरामध्ये रक्तदाब, मधुमेह, इसीजी, रक्त गट आदींची तपासणी होणार आहे. तरी सर्व पत्रकारांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी आणि डॉक्टर विजयकुमार निपटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### अपप्रचार करणाऱ्यांना कामातून

जणू त्यांच्या आयुष्यातील स्वप्नवत क्षण साकार झाले.

हा भव्य लकी ड्रॉ माजी आमदार सैय्यद सलीम, शेख शफिकभाऊ, परवेज देशमुख, आणि अर्जुन क्षीरसागर यांच्या उपस्थितीत पार पडला. या प्रसंगी विजेत्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहताना उपस्थितांनाही सुखद अनुभव मिळाला.

ग्राहकांसाठी सोनं खरेदी ही केवळ दागिना नसून नशिबाचे दरवाजे उघडणारी संधी असल्याचं सिद्ध करणारा हा उपक्रम 'अरेबियन ज्वेलर्स'ने नव्या उंचीवर नेला आहे. विजेच्या अभिनंदन करताना अरेबियन ज्वेलर्स, चे मालक महबूब मलिक यांनी भविष्यात भाग्यवान ठरणाऱ्या ग्राहकांसाठी शुभेच्छा!

### मोफत मधुमेह तपासणी

प्रत्येक महिन्यात मोफत रक्त तपासणी शिबिर सुरू असल्याचे सांगितले. मधुमेह कसा रोखता येईल? यासाठी त्यांनी अनेक उपाय सांगून जीवन जगताना आहार,व्यायाम व तणावमुक्त जीवन जगण्याचा सल्ला दिला.यावेळी बोलताना गणपत व्यास म्हणाले की डॉ.अतुल शिंदे हे सेवाभाव जोपासून आरोग्य सेवा देतात.समाजाशी असलेली बांधिलकी त्यांनी जोपासली म्हणूनच आज अनेकजण मधुमेहाच्या दुष्परिणामा पासून दूर आहेत. यावेळी डॉ.रामकृष्ण लोंढे, डॉ. नवनाथ घुगे, डॉ श्रीनिवास रेड्डी, डॉ सुलभा पाटील,डॉ.राजेश इंगोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे संचालन विनायक मुंजे यांनी केले.तर उपस्थितांचे आभार धनराज सोळंकी यांनी मानले.

### एकनाथ शिंदे यांनाच

करावे अशी मागणी गेवराई शहरात डिजीटल बॅनर लावून मागणी करण्यात आली आहे. यावेळी ग्रामरोजगार सहाय्यक कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष जालिंदर शेजूळ, उपाध्यक्ष गंगाधर गलधर ,सचिव गौतम तुरुकमारे , भगवान आडागळे , नंदकुमार पौळ, सुभाष लोंढे, नदीम शेख , डिंगाबर गायकवाड , गौतम गालफाडे, सुरेश राठोड, तुकाराम गवारे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऊसतोड कामगाराची मुलगी झाली अधिपरिचारिका

**बीड । प्रतिनिधी**

शहरापासून २५-३० किलोमीटरच्या अंतरावरत वसलेलं वैद्यकिन्ही हे गाव खरंतर दोन -तीन हजार लोक वस्तीच गाव.त्याच गावात ज्ञानोबा पारवे आणि सुशीला पारवे हे दांपत्य राहत. आयुष्याला अठराविश्व्? दारिद्र्य लाभलेलं असताना.आपल्या विचारात शिव,शाहू,फुले,आंबेडकर यांचे विचार आणि कार्य रक्तात मिसळून घेणाऱ्या आणि चळवळीत अगदीच भाग घेऊन अन्यायाला वाचा फोडणारे हे कुटुंब.ऊसतोड कामगार कधी कोल्हापूर,कधी सांगली तर कधी सातारा या ऊस असलेल्या शहरात हे कुटुंब आपल्या चार छोट्या चिल्या पिल्यांना घेऊन त्यांना जगवण्यासाठी चाललेली ही धडपड.बाबासाहेब नेहमी म्हणायचे तुम्हाला चांगला माणूस बनायचं आणि बनवायचा असेल तर शिक्षण घेतलं पाहिजे आणि हेच वाक्य आपल्या उराशी बाळगून त्यांनी कष्टाला पोरांच्या शिक्षणाला कधीच काहीच कमी पडू दिल नाही. एक एक दिवस उपाशी पोटी काढला पण पोरांचं शिक्षण थांबवलं नाही.बघता बघता घरातील चार ही पोरांना चांगल शिक्षण दिलं पोराला ग्रॅज्युएट केल.तिन्ही पोरींच नर्सिंग पूर्ण केलं.पोरांनीही आईचा आणि बापाचं कोयता बंद करायचं हे ध्येय मनाशी या चार भावंडांनी बाळगून उंच झेप घ्याची ठरवली.आणि बाबासाहेबांच्या शब्दा आपण प्रमाणे आपण शहरात गेलो पाहिजे आणि मग यांनी थेट मुंबई गाठली.हॉस्पिटल जॉईन केलं.कोविड सारख्या जीव घेण्या




काळात त्यांनी माणुसकी आणि देश वाचवला.दिवस उजाडत गेला रोज उगवणाऱ्या सूर्याला चॅलेंज दिल गेलं.ध्येय वेड्या मनात फक्त एकच जिद्द होती ती म्हणजे गव्हर्नमेंट सर्विस आणि इथल्या शोषित पिढीत लोकांची आपल्या हातून सेवा व्हावी.झोपडीतल्या लोकांना आरोग्य द्यावं त्यांची सेवा करावी.आणि इथल्या बहुजनासाठी आपलं आयुष्य खर्च करावं हेच एक उद्दिष्ट घेऊन मग सुरु झालं अभ्यास.

यातच घरातून चळवळीची शिकवण लाभलेली असतानाच.वाचनात आले इथले संत ज्यांनी माणुसकीची व्याख्या सांगितली.त्यानंतर अनेक पुस्तक हातात पडत गेलीत. शब्दाला धार लागली आणि सुरु झाला साहित्य प्रवास.

आईच बाबाच दुःख,समाजाच दुःख आपल्या लेखणीतून जगाला सांगावं त्यासाठी आपण लिहिलं पाहिजे बोललं पाहिजे. आणि मग काय बघता बघता तो विद्रोहाचा ज्वालामुखी संत तुकोबा,नामदेव ढसाळ नसानसात कधी आला ते समजलंच नाही. मग काम आणि कवी संमेलन आंदोलन हे चालूच झालं.मुंबई असो नाहीतर दिल्ली असो अन्याय झालेल्या लेकींच्या मागे उभ राहीलच पाहिजे हीच बंडाची आरोळी देऊन काम चालू झालं.आपल्या नोकरीवरती अतोनात प्रेम करून आपलं कष्ट प्रामाणिक आहे.हे सिद्ध झालं पाहिजे.आणि आपल्याला कायमची गव्हर्मेंट नोकरी पाहिजे म्हणजे समाजासाठी हातभार लावता येईल.याच विचारानं गव्हार्मेंटची परीक्षा देण्याचा विचार बाळगून कधी चार तास तर कधी पाच तास अभ्यास करून चारच दिवसापूर्वी आपलं नाव गव्हार्मेंटच्या यादीत लावणारी ती....

आता तुम्हाला वाटलं असेल एवढं सगळं लिहिलं गेल. दुःख,कष्ट दारिद्र पण ती कोण आहे...

ती आहे.ऊसतोड कामगारांची पोरगी जिच्या लेखणीन मेलेले मुडदे सुद्धा जागे होतात.

शिव शाहू फुले आंबेडकर विचारांची डरकाळी फोडणारी वाघीण

इथल्या भांडवलशाहीला,आपल्या लेखणीच्या जोरावरती गुडघे ठेकवायला लावणारी

कधी विद्रोहाची तर कधी बंडाची तर कधी प्रेमाची

हाक देणारी. विद्रोही कवयित्री कु. आम्रपाली ज्ञानोबा पारवे

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार

शनिवार दि. ३० नोव्हेंबर २०२४ ४

# बिबट्याच्या दररोजच्या दर्शनाने शेतकरी धास्तावले

पैठण : दररोज होत असलेल्या बिबट्याच्या दर्शनाने शेतीकाम सुटत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. पाचोड (ता. पैठण) परिसरातील चार-पाच गावांत बिबट्या दृष्टीस पडून त्याने काही जणांवर हल्ल्याचा प्रयत्न केल्याने शेतकरी धास्तावला आहे. चार दिवसांत चार ठिकाणी बिबट्याने हल्ल्याचा प्रयत्न केला.

सोमवारी (दि. २५) चार गावांत बिबट्याचे दर्शन होऊन हर्षी (ता. पैठण) शिवारात एका शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ल्याचा प्रयत्न केला. तीन आठवड्यांपासून बिबट्याने पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांना जेरीस आणले आहे. आता इथे तर तासभराने दुसऱ्या गावांत त्याचे दर्शन होत असल्याने नेमके बिबटे किती, या विषयी संभ्रम निर्माण झाला आहे. वन विभागही त्यांस पकडण्यात अजून यशस्वी नाही. सर्वप्रथम पंधरा दिवसांपूर्वी बिबट्याने वडजी शिवारात पहिल्या दिवशी दोन वगारांना ठार केले. दुसऱ्या दिवशी एका हरिणीला भक्ष्य बनविले. तिसऱ्या दिवशी ७४ जळगाव येथे बारा वर्षीय मुलीवर हल्ला केला त्यात उपचारादरम्यान मुलीचा मृत्यू झाला. या घटनेनंतर वडजी येथील कापूस वेचणी करणाऱ्या महिलेवर त्याने हल्ला केला. शनिवारी (दि. २३) वडजी येथील बापूसाहेब सरसराव भांड हे दुपारी शेतातून मोटार सुरू करून दुचाकीवरून घरी परतत असताना बिबट्याने त्यांचा पाठलाग केला. परंतु त्यांनी आरडाओरड करून



मोठ्या धैर्याने दुचाकी पळवल्याने व माणसांचा घोळका समोर आल्याने बिबट्या परत फिरला व बापूसाहेब बचावले. तर रात्री बिबट्या थेरगाव-वडजी रस्त्यावर दिसला. काही जणांनी त्याचे छायाचित्र काढून सोशल मीडियावर पसरविले. रविवारी (दि. २४) सकाळीच बिबट्याने वडजी गावात पवन भांड यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ग्रामस्थांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने शेतात धूम ठोकली. दुपारी मुरमा शिवारात दर्शन घडविले. सोमवारी (दि. २५) सकाळीच सुलतानपूर-पारुंडी रस्त्यावर बिबट्या ठाण मांडून बसला होता. राजू निसर्गे पारुंडीहून सुलतानपूरला येत असताना त्यांनी बिबट्याला पाहून गावांत माहिती दिली. दुपारी मुरमा शिवारात कापूस वेचणाऱ्या महिलांना बिबट्या दिसल्याने त्यांनी गावात पळ काढला. त्यानंतर तासाभराने बिबट्याने हर्षी बुद्रुक शिवारात आबासाहेब मुरलीधर आगळे हे आपल्या गट नंबर २० मधील शेततळ्यात मोटार सुरू करण्यासाठी गेले असता उसातून त्यांच्या दिशेने हल्ल्याच्या उद्देशाने झेप घेतली. मात्र शेततळ्याला असलेल्या कुंपणामुळे आगळे वाचले. त्यांनी आरडाओरड केल्याने बिबट्या त्याच्या बछड्यासह उसाच्या पिकांत निघून गेला. त्यानंतर बिबट्याचे तासभराने थेरगाव शिवारात तुरीच्या पिकांत दर्शन झाले. यासंबंधी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच त्यांचे पथक घटनास्थळी आले व त्यांनी बिबट्याचे ठसे व अक्षांश-रेखांशमध्ये फोटो घेऊन ते परत निघाले असता ग्रामस्थांनी त्यांना धारेवर धरले. दररोज बिबट्याचे मुरमा, थेरगाव, दादेगाव कोळीबोडखा, हर्षी, कुतूबखेडा, वडजी शिवारात तास-दीड तासाच्या अंतराने दर्शन होऊ लागल्याने त्याच्या धास्तीने शेतावर कुणी जाण्यास धजेना. सर्वत्र गहू, हरभरा पेरणी सोबतच पिकांना पाणी देण्याचे व कापूस वेचणीचे सुरू असलेली कामे खोळंबली आहेत. वन विभागाने चार ठिकाणी पिंजरे बसविले असून तीन आठवड्यांपासून बिबट्या हुलकावणी देत आहे. वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी वडजीचे सरपंच भाऊसाहेब गोजरे, पाचोडचे उपसरपंच नितीन वाघ, बाळूभाऊ भवरे, दत्तात्रय भवरे, बाबूतात्या गोजरे आदींनी केली आहे.

## दुबार रोपवाटिकांत कांदा बियाण्यांची उगवणक्षमता कमी



ऑक्टोबरमध्ये झालेल्या मान्सूनोत्तर पावसामुळे रब्बी उन्हाळ कांदा रोपवाटिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी पुन्हा घरगुती तर काहींनी कंपन्यांचे बियाणे खरेदी करून दुबार रोपवाटिका तयार केल्या. मात्र घरगुती बियाण्यांच्या तुलनेत कंपन्यांच्या बियाण्यांची उगवणक्षमता कमी असल्याची ओरड शेतकऱ्यांची आहे. तर काही ठिकाणी उशिराने बियाणे उगवत आहेत, त्यामुळे प्रस्तावित लागवडीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

यंदा रब्बी कांदा बियाण्यांची उपलब्धता मागील वर्षीच्या तुलनेत कमी होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी सुरुवातीला खर्च करून रोपवाटिका तयार केल्या. सप्टेंबरअखेर पेरलेल्या रोपांची उगवणक्षमता चांगली होती. मात्र १४ ते १९ ऑक्टोबरदरम्यान मॉन्सूनोत्तर पावसाच्या तडाख्यात रोपवाटिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना दुबार रोपवाटिका तयार करण्याची वेळ आली. मात्र दुसऱ्यांदा शेतकऱ्यांनी पदरमोड करून महागडे बियाणे घेतले. तर काहींकडे शिल्लक घरगुती बियाण्यांचा वापर केला. या घरगुती बियाण्यांचा उतारा चांगला दिसून येत आहे, तर कंपन्यांचा उतारा उशिराने तर विरळ दिसून येत असल्याची शेतकऱ्यांची ओरड आहे. त्यामुळे संभाव्य लागवडीसाठी रोपांची उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होणार आहे. त्यामुळे काही ठिकाणी लागवडीवर परिणाम होऊ शकतो, असाही अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

## उसावर वाढतोय लोकरी माव्याचा प्रादुर्भाव; वेळीच करा एकात्मिक नियंत्रण

राज्यात ऊस पिकावर सध्या मोठ्या प्रमाणात लोकरी माव्याचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. पांढरा लोकरी माव्याची पिल्ले आणि प्रौढ उसाच्या पानातील रस शोषण करतात, यामुळे पानांवर पिवळसर ठिपके दिसतात व पाने कोरडे पडून वाळतात. ऊस कमकुवत होतो, वाढ खुंटते, उत्पन्नात व साखर उताऱ्यात घट येते. याशिवाय माव्याने बाहेर टाकलेल्या मधारासारख्या विष्ठेमुळे पानावर काळी बुरशी वाढून पानाच्या अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. या किडीमुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. जाणून घेऊ या किडीचे एकात्मिक नियंत्रण उपाय.

ऊस पिकावरील मावा किडीचे एकात्मिक नियंत्रण उपाय :

उसाची लागण पट्टा अथवा रुंद सरी पध्दतीने करावी जेणे करुन पीक संरक्षण उपाययोजना करणे सोयीस्कर होईल. सुरुवातीस कमी प्रादुर्भाव असलेल्या शेतातील कीडग्रस्त पाने तोडून जाळून टाकावीत. कीडग्रस्त शेतातील पाने दुसऱ्या शेतात नेऊ नयेत. कीडग्रस्त बेणे वापरु नये. फवारणीनंतर १० ते १५ दिवस ऊस किंवा उसाचे वाढे जनावरांना खाऊ घालू नये. कोनोबाथ्रा अफिडोव्होरा या परभक्षी मित्र किटकांची २५०० अंडी किंवा १००० अळया प्रति हेक्टर शेतात सोडाव्यात. क्रायसोपा या परभक्षी मित्र किडीची २५०० अंडी/अळया प्रति हेक्टरी सोडाव्यात. जैविक मित्र कीटक शेतात सोडल्यावर किटकनाशकांची फवारणी ३ ते ४



आठवडे करु नये. फोरेट हे कीटकनाशक ऊस तोडण्यापूर्वी तीन महिने वापरु नये.

पांढरा लोकरी मावा किडीच्या नियंत्रणासाठी फवारणी :

पांढरा लोकरी मावा किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास ऑक्सिडिमेटॉन मिथाईल (२५ टक्के प्रवाही) ६०० मिलि ४०० लिटर पाण्यामध्ये (लहान ऊस असताना ) १०५० मिलि ७०० लिटर पाण्यामध्ये (मध्यम ऊस असताना), १५०० मिलि १००० लिटर पाण्यामध्ये (मोठा ऊस असताना) फवारणी करावी. किंवा डायमिथोएट (३० टक्के प्रवाही) ६०० मिलि ४०० लिटर पाण्यामध्ये (लहान ऊस असताना), १०५० मिलि ७०० लिटर पाण्यामध्ये (मध्यम ऊस असताना) १५०० मिलि १००० लिटर पाण्यामध्ये (मोठा ऊस असताना) फवारणी करावी. किंवा मॅलेथिऑन (५० टक्के प्रवाही) ८०० मिलि ४०० लिटर पाण्यामध्ये (लहान ऊस असताना) १४०० मिलि ७०० लिटर पाण्यामध्ये (मध्यम ऊस असताना) २००० मिलि १००० लिटर पाण्यामध्ये (मोठा ऊस असताना ) मिसळून फवारणी करावी. किंवा फोरेट १० दाणेदार १५ किलो प्रति हेक्टरी टाकण्याची शिफारस केली आहे.

# पॉलीकल्चर तंत्राने करा मत्स्यपालन

पॉलीकल्चर फिश फार्मिंग, ज्याला संमिश्र मत्स्यसंवर्धन किंवा मिश्र मत्स्यशेती म्हणूनही ओळखले जाते, हे एक तंत्र आहे ज्यामध्ये एकाच तलावामध्ये माशांच्या अनेक प्रजाती वाढवल्या जातात. या तंत्राद्वारे वेगवेगळ्या आहाराच्या सवयी असलेले मासे एकाच तलावात पाळले जातात. म्हणजे त्याच तलावात तुम्ही रोहू ते कातला आणि इतर प्रजाती पाळू शकता.

पॉलीकल्चरमध्ये ब्लॅक कार्प, ग्रास कार्प आणि सिल्व्हर कार्प यासारख्या माशांचे संगोपन त्याच तलावात करता येते. आहार घेण्याच्या सवयीचा संबंध आहे, तर एकाच तलावात विविध प्रकारचे खाद्य असलेले मासे पाळले जातात. यामध्ये प्लँक्टन फीडर, तृणभक्षी, तळाचे खाद्य आणि विषारी मासे यांचा समावेश होतो.

पॉलीकल्चर मत्स्यपालनचे उद्दिष्टे : निरोगी आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर माशांचे पालन करणे. प्रति हंगाम जास्तीत जास्त माशांचे उत्पादन घेऊन त्याद्वारे जास्त उत्पन्न मिळविणे. आर्थिकदृष्ट्या फायदेशीर अशा विविध माशांचे एकत्र संगोपन करणे. मत्स्य तलावाचा उत्पादकतेच्या दृष्टीने पूर्ण क्षमतेने वापर करणे, तलावाचे योग्य पर्यावरणीय संतुलन राखणे. उपलब्ध विविध प्रकारच्या अन्नाचा वापर करणे. मासे



पालकांना योग्य आर्थिक परतावा मिळवून देणे.

पॉलीकल्चर माशांसाठी सर्वोत्तम आहार प्लँक्ट : प्लँक्टन मोठ्या प्रमाणात आणि कोणत्याही तलावात सहज आढळणारा खाद्य आहे. त्यामुळे पॉलीकल्चरमध्ये असे मासे जास्त पाळले जातात जे प्लँक्टन खाऊन जगू शकतात. या प्रकारच्या तलावात मोठ्या प्रमाणात लहान आणि तरंगणारे प्लँक्टन असतात ज्यांना मासे आवडीने खातात. हे प्लँक्टन वाढवण्यासाठी मत्स्यपालक तलावात खत घालतात. खतामुळे प्लवकांची वाढ वाढते आणि माशांसाठी मुबलक चारा तयार होतो. मासे त्यांचा अन्न म्हणून वापर करतात. कातलासारखे माशांचे या प्रकारच्या आहाराने वजन झपाट्याने वाढतात. सिल्व्हर कार्प आणि बिगहेड कार्प मासे प्लँक्टनवर चांगले पाळले जातात. या प्रकारच्या माशांचे वजन झपाट्याने वाढते.

पॉलीकल्चरमध्ये पाळता येणारे मासे : पॉलीकल्चरमध्ये, काही मासे असे देखील पाळले जातात जे गवत किंवा पाण्याची झुडूप खातात. त्यांना शाकाहारी म्हणतात. मासे पाण्यात आढळणारे गवत खातात. यामध्ये ग्रास कार्पचे नाव प्रमुख आहे जे पॉलीकल्चर अंतर्गत तलावामध्ये पाळले जाते जेणेकरून ते तण किंवा गवत खाऊन नष्ट करू शकतात. याचा फायदा इतर माशांना होतो. त्याचप्रमाणे काही मासे हे तळाचे खाद्य म्हणजे तलावाच्या गाळावर आढळणाऱ्या गोष्टी खातात. हे मासे विविध प्रकारचे प्राणी खातात. जसे की पाण्याखालील कीटक, किडी, गोगलगाय आणि जीवाणू वगैरे. कॉमन कार्प हे असेच मासे आहेत जे गाळावर आढळणारे जीव खाऊन जगतात. याचे पालन केल्याने शेतकऱ्यांना जास्त मेहनत करावी लागत नाही आणि त्यांचे वजनही वाढते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. पॉलीकल्चरमध्ये असेही मासे पाळले जाणारे जे इतर मासे खातात. या प्रकारचे मासे इतर माशांचे ५-७ ग्रॅम मांस खाऊन स्वतःचे वजन एक ग्रॅमने वाढवतात. ज्या माशांची गरज नाही ते तलावातून काढता यावेत म्हणून पशुपालक हे मासे पाळतात. यामध्ये कॅटफिशसारख्या माशांचा समावेश आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७३१ : चीनच्याबीजिंगला झालेल्या भूकंपात एक लाख लोक मरण पावले होते.
१७५९ : दिल्लीचा सम्राट आलमगीर द्वितीय च्या मंत्र्याची हत्या झाली होती.
१८७२ : हॅमिल्टन क्रिसेंट, ग्लासगो येथे स्कॉटलंड व इंग्लंड यांच्यामधे जगातील पहिला आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामना खेळण्यात आला.
१९१७ : कलकत्ता येथे 'आचार्य जगदीश चंद्र बोस इन्स्टिट्युट' ची स्थापना
१९३९ : सोव्हिएत युनियन ने सीमा विवादामुळे फिनलंड वर आक्रमण केले होते.
१९६१ : मध्ये सोव्हिएत युनियन ने कुवैत च्या संयुक्त राष्ट्राच्या अर्जाचा विरोध केला होता.
१९६५ : प्रसिद्ध व्यंगचित्रकार शंकर पिल्लई यांनी दिल्लीला बाहुल्यांच्या संग्रलायाची स्थापना केली होती.
१९६६ : बार्बाडोसला (युनायटेड किंगडमपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९९४ : आजच्या दिवशी सोमालिया च्या जवळ आशि लॉरो नावाचे एक पर्यटक जहाज आग लागून समुद्रात बुडाले होते.
१९९५ : 'ऑपरेशन डेझर्ट स्टॉर्म' संपल्याची अधिकृत घोषणा
१९९६ : ख्यातनाम साहित्यिक पु. ल. देशपांडे यांना महाराष्ट्र सरकारचा पहिला 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' प्रदान. हा महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च पुरस्कार आहे.
१९९८ : एक्सॉन आणि मोबिल यांच्यामध्ये ७३.७ बिलियन अमेरिकन डॉलर्स चा करार झाल्यामुळे एक्सॉनमोबिल ही जगातील सर्वात मोठी कंपनी तयार झाली.
२००० : मध्ये अल गोर यांनी पुन्हा मतमोजणीची अपील केली होती.
२००० : मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीची कलाकार प्रियांका चोपडा मिस वर्ल्ड बनली होती.
२००० : पाच अंतराळवीर आणि महाकाय सौरपंखे घेऊन 'एन्डेव्हर' या अंतराळयानाने फ्लोरिडातील केप कॅनव्हेरॉल येथून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने उड्डाण केले.
२००२ : आय सी सी ने झिम्बाब्वे मध्ये न खेळणाऱ्या देशांवर कारवाई होऊ शकते अशी घोषणा केली.
२००४ : बांगलादेश च्या लोकसभेत महिलांसाठी ४५ टक्के राखीव जागेचे विधायक मंजूर झाले होते.
२००८ : मध्ये आतंकवादी हल्या नंतर सरकारने फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी ला स्थापन करण्याचा निर्णय घेतला.
२०१३ : पाकिस्तान ने सिक्रेट पाकिस्तान नावाचा माहितीपट दाखविल्यामुळे विश्वविख्यात मिडिया बीबीसी च्या प्रसारणावर स्थगिती आणली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०२ : ऑटो व्हॉन गॅरिक - वातावरणाबाबत मूलभूत सिद्धांत मांडणारे जर्मन पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २१ मे १६८६)
१७६१ : स्मिथसन टेनांट - हिरा हा कार्बनच असतो हे प्रयोगावरुन सिद्ध करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ. त्यांनी ऑस्मिअम व इरिडिअम या मूलद्रव्यांचा शोध लावला. त्यांच्या सन्मानार्थ तांब्याच्या एका धातुकाला टेन्नाटाईट (१२४१३) असे नाव दिले आहे. (मृत्यू: २२ फेब्रुवारी १८१५)
१८५८ : जगदीशचंद्र बोस - नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ, वनस्पतींमधील प्रतिक्षिप्त क्रियांवर मूलभूत संशोधन (मृत्यू: २३ नोव्हेंबर १९३७)
१८३५ : मार्क ट्वेन - विख्यात अमेरिकन विनोदकार आणि कादंबरीकार (मृत्यू: २१ एप्रिल १९१०)
१८७४ : विन्स्टन चर्चिल - दुसऱ्या महायुद्धकाळातील ब्रिटनचे पंतप्रधान, साहित्यिक, वृत्तपत्रकार, थोर राजकारणी आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: २४ जानेवारी १९६५)
१९१० : कविवर्य बा. भ. बोरकर ऊर्फ 'बाकीबाब' (मृत्यू: ९ जुलै १९८४)
१९३१ : भारतीय इतिहासकार रोमिला थापर यांचा जन्म.
१९३५ : आनंद यादव - लेखक
१९३६ : भारतीय पार्श्वगायक सुधा मल्होत्रा यांचा जन्म.
१९४४ : हिंदी लेखिका मैत्रेयि पुष्पा यांचा जन्म.
१९४५ : वाणी जयराम - पार्श्वगायिका
२०१० : राजीव दिक्षीत - सामाजिक कार्यकर्ता (जन्म: ३० नोव्हेंबर १९६७).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०० : ऑस्कर वाईल्ड - आयरिश लेखक व नाटककार (जन्म: १६ आक्टोबर १८५४)
१९०९ : इंग्रजी आणि बंगाल मध्ये लिखाण करणारे प्रसिध्द लेखक रमेश चन्द्र दत्त यांचे निधन.
१९१५ : मध्ये प्रसिद्ध तेलगु साहित्यकार गुरुजादा अप्पाराव यांचे निधन.
१९६७ : राजीव दिक्षीत - सामाजिक कार्यकर्ता (मृत्यू: ३० नोव्हेंबर २०१०)
१९७० : निना रिकी - जन्माने इटालियन असलेल्या फ्रेंच फॅशन डिझायनर (जन्म: १४ जानेवारी १८८३)
१९८९ : कॅमेरून देशाचे पहिले अध्यक्ष अहमदिऊ आहिदो यांचे निधन. (जन्म: २४ ऑगस्ट १९२४)
१९९५ : वामनराव कृष्णाजी तथा वा. कृ. चोरघडे - साहित्यिक लघुकथा, लोककथा, बालवाङ्मय, चरित्र, अनुवाद), विचारवंत व स्वातंत्र्यसैनिक (जन्म: १६ जुलै १९१४)
२००१ : मध्ये जगप्रसिद्ध संगीतकार जॉर्ज हॅरिसन याचं निधन.
२०१२ : इंदर कुमार गुजराल - भारताचे १२ वे पंतप्रधान (जन्म: ४ डिसेंबर १९१९)
२०१४ : अरुणाचल प्रदेशचे वे७ मुख्यमंत्री जर्बोम गॅमलिन यांचे निधन. (जन्म: १६ एप्रिल १९६१).

cmyk

# कोट्यावधींची प्लॉट विक्री धारकाचा शासकीय कामांच्या फलकावर डल्ला

## विनापरवाना वृक्षतोड प्रकरणात वनविभागाचे दुर्लक्ष






लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद व नगर परिषद कार्यालयामार्फत जिल्ह्यात होत असलेल्या कामांचे उद्घाटन व लोकार्पण फलक कामाच्या ठिकाणी लावणे बंधनकारक असते.या फलकावर काम कोणत्या विभागामार्फत करण्यात येत आहे, कामांसाठीचा निधी तसे काम कोणत्या कंत्राटदारांच्या कंपनी मार्फत करण्यात येत आहे तसेच काम सुरू करण्याचा व काम पूर्ण झाल्याचा दिनांक या फलकावर नमुद करण्यात आलेला असतो. मात्र या फलकांवर सुद्धा डल्ला मारल्याचा प्रकार प्लॉट विक्री धारकाकडून करण्यात आला असुन अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश येथील हॉटेल सांज गारवा शेजारी भालचंद्र नगर नावाने प्लॉट विक्री सुरू असून प्लॉट विकली धारकाने त्याठिकाणी लावण्यात आलेला फलक हा सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषदेच्या सिमेंट नाला बंधा-यावरील असुन त्यावर कलर करून लावण्यात आला आहे.

परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाव पुर्णपणे पुसले न गेल्याने नाव ठळकपणे दिसून येत आहे. प्लॉट विक्री करणाऱ्या मालकाने शासकीय फलकावर डल्ला मारावा हा विषय चर्चेला बनुन राहिला आहे. तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दि.१२ जुलै अर्थ संकल्प २०२४-२५ दरम्यान लक्ष्यवेधी प्रश्नाला उत्तर देताना महाराष्ट्र वृक्षतोड ( नियमन) अधिनियम १९६४मधील कलम ४ मध्ये दुरुस्ती करून विना परवाना वृक्षतोड प्रकरणात सुरूवातीला १००० रूपये दंडाची रक्कम वाढवून ५० हजार रुपये दंडाची रक्कम आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.निसर्गाचा -हास थांबविण्यासाठी पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी वन विभागाकडून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे तसेच वृक्षतोड करून अवैध वाहतूक केल्यास १९२७ चे कलम ४२ नुसार सदर वाहन व साहित्य जप्त करून १ वर्ष कारावास किंवा ५००० रूपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.मात्र वनविभागातील अधिकारी आणि जिल्हा प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवण्यात व्यस्त दिसून येत आहे. जिल्हा प्रशासनाला याचे गांभीर्य नसुन नियम केवळ कागदावरच असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

# आ.विजयसिंह पंडित यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट



गेवराई। प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी विजयसिंह पंडित यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

विधानसभा निवडणुकीतील यशानंतर आ. विजयसिंह पंडित यांनी आज आंतरवली सराटी येथे जाऊन मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. शिवछत्र परिवाराच्या वतीने आ. विजयसिंह पंडित यांनी मनोज जरांगे पाटील यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करुन त्यांचे आभार मानले. मनोज जरांगे पाटील यांनी विजयसिं पंडित यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, सुनील पाटील, श्रीराम आरगडे, संतोष डावकर, रणवीर पंडित, महेश मोटे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## || थोडक्यात

### मोराळे यांची प्रकल्प संचालकपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार

बीड। प्रतिनिधी



जिल्हा परिषदमध्ये राजेंद्र मोराळे यांची नुकतीच प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग नियुक्ती झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठाण व बीड जिल्हा प्रविण प्रशिक्षक संघटनेच्या वतीने दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांचा सन्मानपत्र, शाल श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला यावेळी बीड पं.स.चे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, मातृभूमी प्रतिष्ठाण व जिल्हा प्रविण प्रशिक्षक संघटनेचे अध्यक्ष ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे, लक्ष्मण चाटे, बाजीराव ढाकणे आदींची उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देतांना मोराळे म्हणाले की, प्रत्येक शासकीय योजना प्रभावीपणे राबवून त्या -त्या योजनेचा लाभ तळागाळापर्यंत पोहोंचण्याचा प्रयत्न मी प्रामाणिकपणे करेल तसेच यापुर्वी मी झेडपी अंतर्गत नरेगा, बीडीओ, केज बीडीओ म्हणून काम केले आहे त्याचा अनुभव आता सोबत आहे तो मी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच लोकांच्या सेवेसाठी उपयोग करेल.

### मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मराठी पत्रकार परिषद स्थापना दिनानिमित्त पाटोदा मध्ये पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशाने आणि मराठी पत्रकार परिषद जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे , पाटोदा तालुकाध्यक्ष अजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी पत्रकार परिषद शाखा पाटोदा आणि ग्रामीण रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने येत्या ३ डिसेंबर २०२४ रोजी पाटोदा येथील पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पाटोदा - मांजरसुबा रोड शहीद चौक पाटोदा येथे ठेवण्यात आले असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषद शाखा पाटोदा यांच्या वतीने देण्यात आली आहे . मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभरात ३ डिसेंबरला दरवर्षी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येते . या शिबीरात पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांची आरोग्य तपासणी केली जाते . या वर्षी पाटोदा येथील डॉ जाधव मध्ये १० ते २ या वेळेत होणार आहे . या शिबीरामध्ये रक्तदाब , मधुमेह , इसीजी , रक्त गट आदींची तपासणी होणार आहे . तरी सर्व पत्रकारांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान मराठी पत्रकार परिषद शाखा पाटोदा आणि डॉक्टर जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे

## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७१६/२०२४**

**CNR NO.MHBI0200037002024**

**अविनाश रघुनाथ नागरगोजे व इत्तर २ वि. निरंक**

**(मार्फत अॅड. ए. एन. बारगजे)**

अर्जदार : १. अविनाश पि. रघुनाथ नागरगोजे, वय ४५ वर्ष, धंदा-शेती, रा. घर न. २३२, पितृस्मृती, जवाहर कॉलनी, नगर रोड बीड ता. जि. बीड . अनिता भ्र. हनुमंत वनवे, वय ५४ वर्ष, धंदा-घरकाम, २ रा. १-४-१३३९, कॅनॉल रोड, ए. आय. सी. ऑफिस जवळ, बिंदुसरा कॉलनी, बीड ता. जि. बीड, ३. अंजली भ्र. सुधाकर खेडकर, वय ५० वर्ष, धंदा घरकाम, रा. भालगांव ता. पाथर्डी जि. बीड विरुध्द निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत अनुसया भ्र. रघुनाथ नागरगोजे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत अनुसया भ्र. रघुनाथ नागरगोजे यांचा मृत्यु दिनांक २७/०९/२०२४ रोजी जीवनज्योत हॉस्पीटल, शिवाजीनगर बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ हि मयाताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ व ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच मयताचे पती नामे रघुनाथ बाबुराव नागरगोजे हे दिनांक १४/०१/२०२३ रोजी मयत झाले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत अनुसया भ्र. रघुनाथ नागरगोजे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईत्तर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०७/०१/२०२५

आज दिनांक २८ माहे नोव्हेंबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

शिक्का

स्वाक्षरित
आदेशावरुन
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# बाल विवाह मुक्त भारत अभियानाला बीड जिल्ह्यात प्रतिसाद

बीड। प्रतिनिधी

केंद्र सरकारने नवी दिल्ली येथे 'बाल विवाह मुक्त भारत' अभियानाची सुरूवात केली असून, बीड जिल्हा प्रशासनाने या अभियानाला मोठा पाठिंबा दिला आहे. जिल्ह्यातील ३६१३ शाळांमध्ये बाल विवाह विरोधी शपथ घेण्यात आली. याशिवाय कॅण्डल मार्च, मशाल मार्गदर्शन, चावडी बैठका, ग्रामसभा आणि इतर जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून या मोहिमेचे समर्थन करण्यात आले.धारूर येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय आणि जीवन ज्ञानदीप गुरुकुल येथील निवासी वसतिगृहांमधील २२० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कॅण्डल लावून बाल विवाह विरोधी शपथ घेतली. यावेळी दोन्ही वसतिगृहातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> बाल विवाहाला समाजातून हद्दपार करण्यासाठी या अभियानामुळे सकारात्मक ऊर्जा आणि जनजागृतीचा मोठा प्रभाव पडत असल्याचे जिल्ह्यातील शाळांमधून दिसून आले आहे. ही चळवळ देशातील बालविवाहाच्या उच्छेदासाठी एक प्रभावी पाऊल ठरत आहे. अनेक स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींनी एकत्रित काम केल्यामुळे देशभरात ही चळवळ यशस्वी होत आहे. या उपक्रमाने देशाच्या हजारो मुलींसाठी नवी आशा निर्माण केली आहे.
>
> - संतोष रेपे,युवा ग्राम विकास मंडळ, केज

संतोष रेपे यांनी मुलांना बाल विवाह कायदा, त्याचे महत्त्व, आणि मुलींच्या जीवनावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी बाल विवाह रोखण्यासाठी शपथ घेतली आणि विविध घोषणा दिल्या.या अभियानाच्या निमित्ताने २०३० पर्यंत बीड जिल्हा बाल विवाह मुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला. युवा ग्राम विकास मंडळ, केज ही जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन या मुलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी काम करणाऱ्या देशव्यापी युतीचा एक भाग आहे. या युतीत २५० पेक्षा अधिक सामाजिक संस्थांचा समावेश असून, त्या मुलांच्या विकासासाठी कार्यरत आहेत. बीड जिल्ह्यात प्रकल्प संचालक एच पी देशमुख युवा ग्राम यांच्या मार्गदर्शनाखाली ५० गावे बाल विवाह मुक्त करण्यासाठी विशेष काम चालू आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांचा होणार भव्य नागरी सत्कार

बीड। प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार संदीप क्षीरसागर यांचा भव्य नागरी सत्कार बीड येथे रविवारी (दि.१) रोजी होणार असून याप्रसंगी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नागरी सत्कार समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील एकमेव निष्ठावंत आमदार संदीप क्षीरसागर यांची तब्बल दुसर्यांदा आमदार पदी जनआशिर्वादाने निवडून आले आहेत. अनेक अडचणी, दबाव, संकटे यांना न जुमानता आ.क्षीरसागर आपल्या आणि पक्षांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिले. याचेच बक्षीस म्हणून बीडच्या जनतेने आ.संदीप क्षीरसागरांना दुसर्यांदा विधानसभेत पाठवून प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली.



आ.संदीप क्षीरसागर दुसर्यांदा आमदार झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी बीड शहर नागरी सत्कार समितीच्या वतीने रविवारी (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे सकाळी ११ वा. भव्य नागरी सत्कारा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मायबाप मतदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा असे आवाहन सत्कार समितीकडून करण्यात आले आहे.

## बाभळगावच्या विद्यार्थ्यांचे मैदानी स्पर्धेतील यश

बाभळगाव। प्रतिनिधी


दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील दोन विद्यार्थ्यांनी खेळाडूंनी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या वैयक्तिक क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. त्यामध्ये कु. अंजली चौधरी हिने १०० मीटर धावणे आणि १०० ४ रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला तर कु. नेहा डोंगरे हिने हातोडा फेक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. दोन्ही खेळाडूंचे स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या संघामध्ये पुढील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना क्रीडा संचालक डॉ. वैशाली माडेकर आणि डॉ. नाना जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या यशाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव अध्यक्ष आ. धीरज देशमुख, सचिव शाम देशमुख, सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, क्रीडा सल्लागार सदस्य डॉ. शाहूराज मुळे, डॉ.दशरथ भिसे, बाळासाहेब देशमुख सर्व क्रीडा सल्लागार मंडळ, प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# आ.प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपद द्या

## माजलगाव मतदारसंघातील जनतेची मागणी

माजलगाव। प्रतिनिधी



माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय नेतृत्व आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी थेट आमदारकीची निवडणूक न लढवता जिल्हा परिषद पासून आपल्या राजकीय प्रवासाचा श्री गणेशा केला जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, आमदार, राज्यमंत्री, साखर कारखान्याचे चेअरमन, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष या विविध पदांवर त्यांनी कार्य केले आहे. व सध्या करत आहेत माजलगाव विधानसभा मतदार संघातील विकासाचा पाईक म्हणून ओळखले जाणारे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या राजकीय प्रवासात अनेक महत्वपूर्ण कामगिरी बजावली असून त्यांच्या निष्काम सेवेमुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास झाला आहे.

प्रकाश दादा सोळंके यांनी माजलगाव मतदार संघात सिंचन, वीज, दळणवळण, शिक्षण आणि औद्योगिक विकासावर भर दिला. शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना, गावोगावात वीज पुरवठा, राष्ट्रीय महामार्गांशी जोडणी आणि माजलगाव धारूर येथील औद्योगिक वसाहत त्यांच्या महत्वाच्या कामगिरीचे प्रमुख उदाहरण आहेत. या विकास कामांमुळे मतदार संघातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. स्वर्गीय सुंदररावजी सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय कार्यात सक्रिय झालेले दादा सोळंके हे जातीय भेदाभाव न करता सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र घेऊन चालणारे समावेशक नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या निष्काम सेवेमुळे ते पाच वेळा माजलगाव मतदार संघाचे आमदार झालेले असून त्यांची लोकप्रियता अफाट आहे. आता मतदार संघातील जनता त्यांना मंत्रीपद मिळावे अशी मागणी करत आहे.

## अध्यक्षपदी राजेंद्र गोरे, उपाध्यक्षपदी राजेश पवार

पाटोदा। प्रतिनिधी



लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था म.पाटोदा च्या अध्यक्षपदी राजेंद्र गोरे व उपाध्यक्ष पदी राजेश पवार यांची बहुमताने निवड झाली आहे या निवडीबद्दल त्यांचे आ.सुरेश धस यांनी अभिनंदन केले आहे

लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था पाटोदा च्या कार्यालयात चेअरमनपदी राजेंद्र पांडुरंग गोरे व व्हाईस चेअरमनपदी राजेश चंद्रकांत पवार यांची सहाय्यक निबंधक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बहुमताने निवड करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष उद्धव राख उपाध्यक्ष बाळासाहेब मुसळे सचिव पोपट साबळे सरसंचालिका श्रीम टेकाळे, लीला पोकळे तसेच संचालक परशुराम सोंडगे,दिलीप खाडे, प्रकाश राख विजय नागरगोजे, प्रवीण काळूशे, पंढरीनाथ सोंडगे संदीप जावळे व गजानन भोसले तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष रमेश नागरगोजे, उपाध्यक्ष. श्रीहरी येवले, सचिव पांडुरंग शिंदे, मा.संचालक बाबासाहेब रंधवे, तसेच सभासद फुलचंद बडे, संतोष,कवठेकर, अंकुश तांबे, सुरेश नागरगोजे, सय्यद उपस्थित होते यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे आ.सुरेश धस यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या आहेत.

# अठरा पगड जातीचा माजलगांवचा देव खंडोबा

## चंपाष्टीनिमित्त मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

माजलगांव। प्रतिनिधी

शहरातील पुरातन सर्वांचे कुलदैवत व आराध्य दैवत जागृत देवस्थान श्री. खंडोबा मंदीरात २९ नोव्हेबर शुक्रवार रोजी भक्तांचा उपस्थित घटस्थापना करण्यात आली व यात्रे ला प्रारंभ करण्यात आला आहे. चंपाष्टी यात्रा निम्मित मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे चे आयोजन केले आहे.तरी सर्वा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा आसे अवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तजनाने केले आहे.एके काळी माजलगांव मध्ये आपल्या सर्वांचे कुलदैवत असलेले श्री खंडोबा मंदीर खंडोबा मैदानात. पाय ठेवायला जागा पुरत नव्हती एवढी मोठी खंडोबा यात्रा. भरत होती आता जागेच्या आभावीमुळे थोड्या प्रमाणात खंडोबा यात्रा भरते. पुरातन दगडी चिरेपासुन माजलगांवच्या खंडोबा मंदिर बनवलेले होते. तेच दगडी चिरे आज भी जशा तशे आसुन.मंदीराच्या आत मधील गभारात चिर किवां छिद्र सुध्दा दिसणार नाही आस मजबुत दगडी चिरेच्या बाहेरच्या लगत नवीन बांधकाम केलेले आहे.माजलगांव चे पुरातन खंडोबा मंदीर है ७० वर्षोंच्या पुढचे आहे. खंडोबाच्या समोरचा नंदी सुध्दा पन्नास वर्षाच्या पुढचा आहे. आजुक सुध्दा जसा तसा आहे. या खंडोबाच्या नंदीच वजन जास्त आहे. पाच जनाला सुध्दा उचलत नाही.



श्री खंडोबा देव , म्हालसांदेवी व बानुदेवी या देवाच्यां मुर्ती साक्षात भूतलावर आवतरल्या सारख्या वाटतात. २९ नोव्हेबर रोजी मंदीरात घटस्थापना , ६ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजता २१०० दिपोत्सवचा कार्यक्रम , ७ नोव्हेबर रोजी चंपाष्टी निम्मित ५ वाजता सकाळी देवाचा महाभिषेक ला सुरुवात होईल सकाळी ७ वाजता खंडोबा मल्हासादेवी ,बाणुदेवी यांचा विवाहचा कार्यक्रम ,व महाआरती सहीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे तरी भाविक भक्तानी धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तजनाने केले आहे

### खंडेरायाला रेवड्या व भंडाराची उधळन

माजलगांवच्या खंडोबाला चंपाष्टी दिवशी माजलगांवतील आठरा पकड जाती चे भाविक खंडोबा मंदीरात येऊन. सदानंदाचा येळकोट येलकट जय मल्हार चा गजरात रेवड्या भंडाराची उधलन होते. रेवड्या व भंडारा मंदिरावर उधलेला भक्तजन प्रसाद म्हणून घेतात. व आपल्या कपाळावर भंडारा लावतात.

### घरोघरी तळी भंडारा

माजलगांव शहरातील भाविक आपल्या घरी चंपाष्टी दिवशी. देवाच्या ताब्यांचे कोंटुबाची पुजा करून. वाग्यांचे भरीत, बाजरीची भाकरी, काद्यांची पात. इत्यादी पदार्थाचा नैवेद्य. ठेवुन पाच वेळा सदानंदाचा येळकोट येलकट जय चा गजर करुन. तली भंडारा कार्यक्रम होतो. व वागीं व कांदा खानाची परवानगी मिलते

# डॉक्टर आपल्या कुटुंबियांना बीड शहराचे वाटोळे करण्यासाठी ३० वर्षे कमी पडले काय ? -खुर्शीद आलम

## भ्रष्टाचार रोखण्यासाठी आणि विकासकामेसाठी आत्मदहनाची वेळ कोणी आणली होती

**बीड । प्रतिनिधी**

अवघ्या काहीच दिवसांपूर्वी विधानसभेत पराभूत झाल्यानंतर आत्मचिंतन करण्याऐवजी डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिका ताई क्षीरसागर यांनी पत्रकार परिषद घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांच्यावर ताशेरे ओढत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तैयारी दर्शविली आहे, आश्चर्याची बाब म्हणजे बीड शहरातील मतदारांनी शहरातील विकासाच्या दृष्टीने सतत तब्बल तीस वर्षे डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्याकडे एकहाती सत्ता दिली होती. या सत्तेमध्ये डॉ.दिपाताई, डॉ.योगेश, डॉ.सारीकाताई हे सुद्धा सामील होते तरीही बीड शहराचा विकास तर सोडाच पण शहरातील लोकांना मुलभूत सुविधाही परिपूर्णरित्या डॉ.क्षीरसागर कुटुंबियांच्या सत्ताकाळात देता आल्या नाहीत! आता



विधानसभेच्या पराभवानंतर स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्याच्या तयारीत असणाऱ्या डॉ.क्षीरसागर कुटुंबियांना खुर्शिद आलम यांनी बीड शहराचे वाटोळे करण्यासाठी ३० वर्षे कमी पडली काय? असा परखड सवाल पत्रकाद्वारे खुर्शिद आलम यांनी केला आहे.

डॉ.क्षीरसागर कुटुंबियांच्या सत्ताकाळात रोड रस्ते नाल्या वगैरे विकास झाले नाहीत. विकासकामे तर सोडाच पण या उलट भ्रष्टाचार वाढला त्यांना शहरातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवता आले नाही. शहर स्वच्छता ठेवता आला नाही. दहा दहा महिने खंब्यावरील स्ट्रीट लाईट बंद पडल्या त्यादेखील चालु करता आल्या नाहीत. अखंडित तब्बल तीस वर्षात बीड शहरवासीयांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देता आल्या नाहीत. बीड नगरपालिकेत फक्त आणि फक्त नियमित भ्रष्टाचार दिसून आले म्हणून उच्चस्तरीय चौकश्या लागल्या. शहरातील विकासकामांसाठी आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात कौन्सिल मध्ये आम्हाला स्वतःच्याच अंगावर रॉकेल ओतून घेऊन आत्मदहन करण्याची वेळ आली. तरीही डॉ.भारतभुषण क्षीरसागर, डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर यांना भ्रष्टाचार बंद करता आले नाही. म्हणूनच डॉ.योगेश क्षीरसागर यांना बीड विधानसभेच्या निवडणुकीत फटका बसला आहे. बीडची जनतेला आता आपला अजेंडा समजला आहे. असे असतांनाही आता पुन्हा नगरपरिषद ताब्यात घेण्याचे स्वप्न क्षीरसागर डॉक्टर पिता पुत्र पाहताना दिसत आहेत म्हणजेच डॉक्टर पिता पुत्राला बीड शहराचे वाटोळे करण्यासाठी ३० वर्षे पुरली नाहीत का? असा खडा सवाल बीड नगरपरिषदचे माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदपवार पक्षाचे बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# ग्राम महसूल अधिकारी बाबुराव शिंदे यांना नालंदा ऑर्गनायझेशनकडून पुरस्कार



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) बाबुराव काशिनाथ शिंदे यांना पुणे येथे नालंदा ऑर्गनायझेशनकडून 'राज्यस्तरीय आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

बाबुराव शिंदे मूळचे होळ येथील असून त्यांनी गेली अनेक वर्ष पुणे जिल्ह्यात महसूल विभागात ग्राम महसूल अधिकारी पदावर काम केले आहे. गेल्या काही वर्षांपासून ते केज तालुक्यात कुंबेफळ येथे कार्यरत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन नालंदा ऑर्गनायझेशनकडून पुणे येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.



आज शिर्डी येथे सच्चिनांद सद्गुरू श्री साईबाबांचे धनंजय मुंडे यांनी मनोभावे दर्शन घेतले. जनसेवेचा घेतलेला वसा निभावण्यासाठी शक्ती द्या, अशी प्रार्थना यावेळी मुंडेंनी बाबांच्या चरणी केली. धनंजय मुंडे यांनी निवडणुकीच्या आधीही येऊन साईंचे आशीर्वाद घेतले होते. आज पुन्हा साई दरबारात नतमस्तक होऊन मन प्रसन्न झाल्याचे मत धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर व्यक्त केले आहे.

# हसनाबाद येथील नागरिकांचे अमरण उपोषण, तहसील प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

## उपोषणकर्त्यांविषयी तहसीलदारांकडून असंवेदनशीलतेचे दर्शन

किल्लेधारुर । प्रतिनिधी

तालुक्यातील हसनाबाद पासून ते राज्य मार्ग क्र. २३२ पर्यंत शासनाच्या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत डांबरी रस्ता मंजूर झालेला आहे व सदरील रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून हा रस्ता काही शेतकऱ्यांनी जाणून बुजून अडवल्यामुळे त्या हसनाबाद येथील नागरिक प्रशासनास निवेदन देऊन आज दिनांक २९ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालय धारूर या ठिकाणी



उपोषणाच बसलेले आहेत या उपोषणाकडे प्रशासनाने कोणताही अधिकारी कर्मचारी याकडे आलेला नसून उपोषणकर्ते थंडीत कुडकुडले आहेत या उपोषणामध्ये वृद्ध नागरिकांचे चांगलेच हाल झाले आहेत.रस्त्याचे काम थांबले आहे हा रस्ता तात्काळ व्हावा व आम्ही उपोषणास बसणार आहोत असे हसनाबाद ग्रामस्थांनी प्रशासनास दि २७ नोव्हेंबर रोजी निवेदन देऊन कळविण्यात आले असताना सुद्धा २९ नोहेंबर रोजी तहसील कार्यालय समोर हसनाबाद येथील नागरिकांनी उपोषण सुरू केले आहे तहसीलच्या आवारात बसलेल्या उपोषणकर्त्याकडे प्रशासनाचा कोणताही अधिकारी उपोषणाकडे आलेला नाही तर उपोषणकर्त्यांच्या समोरूनच तहसीलदारांनी गाडीत बसून तहसील परिसर सोडल्याने नागरिकांच्या प्रश्नाविषयी तहसीलदार अस्ववेदनशील वागत असल्याचा चर्चा सुरू आहेत सुरू आहेत, या उपोषणात वयोवृद्ध नागरिक व शेतकरी उपस्थित आहेत तहसीलदारांच्या दुर्लक्षामुळे हसनाबाद करांना थंडीत रात्र घालावी लागणार. वेळीच वरिष्ठ कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन हसनाबाद करांचे प्रश्न मार्गी लावून उपोषण सोडवावे अशी मागणी नागरिकांमधून केली जातात.

# एकनाथ शिंदे यांनाच पुन्हा मुख्यमंत्री करा

## गेवराईत झळकतायेत मागणीसाठी डिजीटल बॅनर

गेवराई । प्रतिनिधी

राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विजयानंतर राज्यात मुख्यमंत्री पदाच्या नावावरुन जोरदार चर्चा सुरु आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला मोठं यश मिळालं आहे. परंतु राज्याचा पुढचा मुख्यमंत्री कोण होणार, यावरुन सध्या खेचाखेची सुरु असल्याचं दिसून येत आहे. परंतू सर्वसामान्यांच्या हिताचे आणि काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनाच



पुन्हा मुख्यमंत्री करा, अशा मागणीचे गेवराई शहरात डिजीटल बॅनर झळकल्याचे पहावयास मिळते आहे.

महाराष्ट्रात सध्या मुख्यमंत्रिपदासाठी भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांच्या नावांमध्ये जोरदार चर्चा सुरु आहे. विशेष म्हणजे एकनाथ शिंदे हे मागील कार्यकाळात काळजीवाहू मुख्यमंत्री ठरले असून त्यांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाचे निर्णय झाले असून त्यांनी महिलांसह सर्वसामान्यांसाठी अनेक योजना राबविल्या गेल्यानं पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांनाच मुख्यमंत्री ◀◀ पान ३ वर

# अपप्रचार करणाऱ्यांना कामातून जोरदार उत्तर 'अरेबियन ज्वेलर्स'चे चार लकी विजेते झाले 'बुलेट राजा'

**बीड । प्रतिनिधी**

अरेबियन ज्वेलर्सने ग्राहकांच्या विश्वासाला बळ देत, मुनाफ्यात त्यांच्या हिस्सेदारीचे वचन पाळत, लकी ड्रॉच्या माध्यमातून क्रेटा कार आणि बुलेट मोटरसायकल देण्याचा जाहीर केलेला निर्णय प्रत्यक्षात उतरवून दाखवला आहे. या निर्णयावर काही अपप्रचार करणाऱ्यांनी शंका घेतली होती, मात्र अरेबियन ज्वेलर्सच्या प्रामाणिक भूमिकेने त्या सर्वांच्या तोंडचं पाणी पळवलं आहे.



दिवाळीच्या पहिल्या लकी ड्रॉमध्ये दोन क्रेटा कार विजेत्यांना मिळाल्या. यानंतर, २८ नोव्हेंबर रोजी झालेल्या दुसऱ्या लकी ड्रॉमध्ये तब्बल चार बुलेट मोटरसायकल विजेत्यांना भेट दिल्या गेल्या. एका ग्रॅम सोन्याच्या खरेदीवर लकी कूपन देत ग्राहकांना ही मोठी संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.

पहिल्या लकी ड्रॉमध्ये बीड येथील स्वीट होम चालकाला आणि अंबड येथील ग्राहकाला प्रत्येकी एक क्रेटा कार मिळाली. दुसऱ्या लकी ड्रॉमध्ये बीड शहरातील तीन आणि चौसाळा येथील एका विजेत्याला प्रत्येकी २ लाख रुपये किमतीची बुलेट मोटरसायकल मिळाली. ग्राहकांचा आनंद अवर्णनीय होता,

# मोफत मधुमेह तपासणी शिबिरात १६०० रुग्णाची तपासणी व औषधोपचार



## सलग १२ वर्षांपासून डॉ. अतुल शिंदे यांचा उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजात वाढणारा मधुमेह रोखण्यासाठी विविध उपक्रम राबवत, मधुमेहींची मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी सदैव अग्रेसर असणारे मधुमेह तज्ज्ञ डॉ अतुल शिंदे यांनी १६०० रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले. या उपक्रमाचे त्यांचे १२ वर्ष आहे.

गुरुवारी येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,आयएमए, ॲम्प्पा, व योगेश्वरी डायबेटीस केअर सेंटर, प्रशांत नगर, अंबाजोगाई यांच्या वतीने मधुमेहावरील महाशिबीर व मोफत तपासण्या व मोफत औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटक म्हणून आयएमए चे माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. रामकृष्ण लोंढे, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास होते.तर प्रमुख अतिथी म्हणून आयएमए चे अंबाजोगाई अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे,डॉ.श्रीनिवास रेड्डी,डॉ.राजेश इंगोले,डॉ.सुलभा पाटील,रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी,संयोजक डॉ अतुल शिंदे,डॉ.स्वाती शिंदे यांची उपस्थिती होती.या शिबिरात मधुमेह तज्ज्ञ डॉ अतुल शिंदे यांनी १६०० रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले.

तसेच मधुमेह रोखण्यासाठी युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी ◀◀ पान ३ वर



भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून शेकापने केली आरती

**माजलगाव । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभाग येथील अधिकारी गेल्या तीन महिन्यापासून कार्यालयात येत नसल्याने, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बोगस कामाच्या तक्रारीसाठी शेकडो चकरा माराव्या लागल्याने संतृप्त शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून भ्रष्ट्राचाराची आरती गायली.

# आ. प्रकाश सोळंकेंचा मंत्रिमंडळात समावेश करा - सिताराम क्षीरसागर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे लाडके, अभ्यासु, विकासाची जाण असलेले सर्वसामान्यांचे नेतृत्व आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी अजित दादा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष सिताराम क्षीरसागर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.



माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा विधानसभेत गेले असून त्यांना माजलगाव मतदार संघाच्या विकासाची जाण आहे तसेच बीड जिल्ह्यात विकासात्मक कामे करायची असतील तर दूरदृष्टीनेता म्हणून प्रकाश दादा सोळंके यांना मंत्रिपद देऊन जनतेची सेवा करण्याची संधी पक्षश्रेष्ठीने देणे गरजेचे आहे. सोळंके घराणे या मतदारसंघात विविध विकासात्मक कामे करण्यात तरबेज आहेत प्रकाश सोळंके यांचे वडील स्वर्गवासी सुंदरराव सोळंके या मतदारसंघात माजलगाव सारखे धरण बांधल्यामुळे आज या भागातील शेतकरी समृद्ध झाला आहे तसेच आमदार प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली त्यामध्ये माजलगाव शहर केंद्रीय महामार्ग ला जोडण्याचे महत्वाचे कार्य करून मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. एमआयडीसी उपजिल्हा रुग्णालय, स्त्रीरुग्णालय असे लोक उपयोगी अनेक प्रकल्प त्यांनी या मतदारसंघात राबवली आहेत. जलसिंचनाचे अनेक प्रश्न मार्गी लावल्याने मतदारसंघातील शेतकरी आज समृध्द झाला आहे. त्याचबरोबर उपसा जलसिंचनाचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम लवकरच पूर्ण होण्याची अपेक्षा असून हे काम पूर्ण झाले तर गोदावरी नदी पात्रातील वाया जाणारे पाणी माजलगाव धरणात आल्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटणार आहे म्हणून त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना पाचव्यांदा आमदार केले असून पक्षश्रेष्ठीने त्यांना मंत्रीपद देऊन त्यांच्या विकासात्मक कामाचा गौरव करावा अशी मागणी सामाजिक न्याय विभागाचे सिताराम क्षीरसागर यांच्यासह तोफिक लाला सुलतान, गोपीनाथ क्षीरसागर, नितीन क्षीरसागर, रामा सातपुते, रामा गायकवाड, मुस्तकीम शिफा पठाण, बाबासाहेब सातपुते, दीनानाथ कांबळे, बाबासाहेब सातपुते, सचिन कांबळे, सुमित शिरसागर यांनी केली आहे.

# आश्रम शाळेमध्ये संविधान दिनानिमित्त विविध उपक्रम

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजी नगर अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी ता आष्टी जी बीड या ठिकाणी संविधान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे भारतीय लोकशाहीची यशस्वी वाटचाल चालू असून सर्व नागरिकांचे हक्क व अधिकार यांच्यामुळे जिवंत आहेत, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे व संविधानाचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संविधान जागृती रॅली तथा उद्देशिका वाचनाने करण्यात आली . संविधान उद्देशिकेचे वाचन सुरुडी शाळेचे मुख्याध्यापक श्री सुधाकर राठोड यांनी केले. संविधान दिनानिमित्त



वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पोस्टर निर्मिती स्पर्धा, पथनाट्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक स्पर्धेमध्ये विद्यार्थी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेत होते. छोट्या छोट्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व विद्यार्थी हा सृजनशील व कार्यशील बनतो असे शाळेच्या स्त्री अधीक्षिका श्रीमती प्रतिक्षा मेश्राम यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरुडी शाळेचे मुख्याध्यापक श्री सुधाकर राठोड हे होते व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता पानसरे यांनी केले व आभार प्रदर्शन केतन काकडे यांनी केले. शालेय कर्मचारी श्रीमती नीता मुंडे, शिवाजी गांधले, संतोष मेहत्रे, प्रवीण पुंड, संगीता जाधव, वैजिनाथ आतकरे, मदन सावंत, शाहूराव सानप, किसन शिंदे, वेणूबाई केसकर, मोहन जाधव, विलास जाधव, अमित पवार, मच्छिंद्र शिरसाठ व सर्व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. संविधान दिनानिमित्त यशस्वी उपक्रम राबवल्याबद्दल प्रकल्पाच्या श्रीमती चेतनाजी मोरे (प्रकल्प अधिकारी), सुरुडी शाळेचे पालक अधिकारी विनोदकुमारजी सांगळे (स प्र अ), डॉ. उद्धवजी वायाळ (स प्र अ), प्रवीण भालेराव (लेखाधिकारी), दामोदर भानुसे (स ले आ), भगवान गायकवाड (स प्र अ), भागवत कदम (स प्र अ), गजानन रत्नपारखी (कार्यालयीनअधीक्षक), कारभारी भोरपे (कार्यालयीन अधीक्षक), उल्हास चव्हाण (आदिवासी निरीक्षक), साधना अंभोरे (शिविअ), चेतन सोनवणे (आदिवासी निरीक्षक), पुरुषोत्तम कायंदे (आदिवासी निरीक्षक), सुधाकर यादव (गटशिक्षण आधिकारी,पंचायत समिती,आष्टी) व इतर सर्व अधिकारी यांनी अभिनंदन केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राज्यातील साखर कामगार १६ डिसेंबरपासून संपावर जाणार

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य सरकारने साखर उद्योग व जोडधंद्यातील कामगारांचे वेतन व सेवा शर्ती ठरविण्याबाबत त्वरित त्रिपक्ष कमिटी गठित करावी, साखर कामगारांचे थकीत वेतन मिळण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी साखर कामगारांनी १६ डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांनी दिलेला आहे.



साखर कामगार प्रतिनिधी मंडळाची गुरुवारी (दि. २८) पुण्यात बैठक झाली. या बैठकीला अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांच्यासह सरचिटणीस शंकरराव भोसले, कार्याध्यक्ष अविनाश आपटे, राऊसाहेब पाटील, राज्य साखर कामगार महासंघाचे अध्यक्ष कॉम्रेड पी. के. मुंडे, आनंदराव वायकर आदींसह अन्य प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कळविली आहे. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ ही साखर उद्योगातील नोंदणीकृत व मान्यताप्राप्त मंडळ आहे. राज्यातील साखर उद्योग व जोडधंद्यातील सर्व कामगारांच्या पगारवाढीच्या कराराची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली आहे. तत्पूर्वी पगारवाढीच्या मागण्यांबाबतच्या बदलाची नोटीस मंडळाने १० फेब्रुवारी २०२४ रोजी दिलेली आहे. याशिवाय मुख्यमंत्री, सहकारमंत्री, कामगारमंत्री, साखर आयुक्त, राज्य सहकारी साखर कारखाना संघ व अन्य यांनाही मागण्यांचा मसुदा २७ फेब्रुवारी रोजी पाठवूनही प्रतिसाद मिळालेला नाही. भाडेतत्त्वावर व भागीदाराने व विक्री केलेल्या तसेच खासगी साखर कारखान्यातील कामगारांना त्रिपक्षीय समितीच्या कराराप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे व त्यांच्या थकीत पगाराची रक्कम अग्रक्रमाने मिळाली पाहिजे. याबाबत स्थानिक संघटनांची मान्यता घेऊनच करार करावा. तसेच, शेती महामंडळातील कामगारांचे प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करावी, अशाही मागण्या मंडळाचे अध्यक्ष काळे व सरचिटणीस शंकरराव भोसले यांनी शासनाकडे केलेली आहे.

# मांढरदेवीला निघालेल्या भाविकाचा अपघाती मृत्यू

**नसरापूर । प्रतिनिधी**

सातारा महामार्गावर सारोळे (ता. भोर) येथे झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. सहकुटुंब काळूबाई दर्शनासाठी जात असताना बंद पडलेल्या वाहनाकडे रस्ता पार करून पायी जात असताना भरधाव ट्रकने ठोकरल्याने ही घटना घडली. उत्तम वामन झेंडे (वय ६०, रा. वडकी नाला, ता. हवेली), असे त्यांचे नाव आहे.

झेंडे कुटुंबीय शुक्रवारी (ता. २९) सकाळी काळूबाई मांढरदेवी दर्शनासाठी वाई रस्त्याने जाण्यासाठी दोन वाहनांनी निघाले होते. त्यावेळी सकाळी ११ वाजता पुणे-सातारा महामार्गावर सारोळे येथील 'हॉटेल मल्हार'समोर त्यातील एका वाहनाचा टायर पंक्चर झाला. यावेळी उत्तम झेंडे हे दुसऱ्या वाहनात पुढे निघून गेले होते. टायर पंक्चर झाल्याचा फोन येताच ते वाहनासह सारोळा उड्डाणपुलाखालून पुन्हा वळून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला आले. रस्ता ओलांडत पलीकडे असलेल्या वाहनाकडे जात असताना सातारा बाजूकडून पुण्याच्या दिशेने भरधाव जाणाऱ्या ट्रकची (क्र. के.ए.२२ ए.ए.४३६३) त्यांना जोराची धडक बसली. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. कुटुंबीयांसमोर झालेल्या या अपघाताने एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच राजगड पोलिस, महामार्ग पोलिस व आर.टी.ओ. अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अपघातातील ट्रक चालक मुगुटसाहब अब्दुल कादीर जयलानी सय्यद (वय २७) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. याबाबत अंकुश राजाराम फाटे (वय ३८, रा. वडकी-तळेवाडी, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली. याबाबतचा पुढील तपास पोलिस हवालदार नाना मदने करत आहेत.

# लोहमार्गावरील कालबाह्य उड्डाणपूल पाडा ; रेल्वे विभागाचे महापालिकेस पत्र



**चिंचवड । प्रतिनिधी**

महापालिकेच्या स्मार्ट सिटी अंतर्गत रस्ते चांगले करण्यात आले आहेत. मात्र, अंतर्गत रस्त्यांवर असणार्या खासगी शाळांच्या बस आणि रिक्षांच्या सततच्या वर्दळीमुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. पुणे-मुंबई जुन्या महामार्ग आणि पिंपरी गावास जोडणारा पुणे-लोणावळा लोहमार्गावरील पिंपरी येथील उड्डाण पूल हा शहरातील सर्वांत पहिला पूल आहे. या इंदिरा गांधी पुलाचे आयुष्य संपले असून, बांधकाम धोकादायक झाले आहे. तो पूल वाहतुकीस बंद करा. पूल पाडून टाका, असे पत्र रेल्वे विभागाने महापालिकेस तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डिकर यांच्या कार्यकाळात पाठविले होते. शहरातील दोन भागांना जोडणारा हा महत्वाचा पूल असल्याने महापालिकेने पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले. त्यानंतर त्यांचे मजबुतीकरण करण्यात आले. हे काम सुमारे तीन वर्षे सुरू होते. शहरातील चिंचवड स्टेशन येथील लोहमार्गावरील उड्डाण पुलाच्या बांधकामास ४७ वर्षे झाली आहेत. ते बांधकामही धोकादायक झाले असून, तो पूल पाडा, असे पत्र रेल्वेने महापालिकेस नुकतेच पाठविले आहे. या पुलाशेजारी, महापालिकेने सुमारे १५ वर्षांपूर्वी समांतर पूल बांधला आहे. जुना पूल तोडावा लागणार असल्याने येथील वाहतुकीची समस्या अधिक गंभीर होणार आहे. हे दोन्ही पूल महापालिका पाडणार की, नव्याने पुन्हा तयार करणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# कोल्हेवाडीतील खून प्रकरणात चौघांना अटक, एक फरार

**हवेली । प्रतिनिधी**

पानशेत रस्त्यावरील खानापूर थोपटेवाडी ( ता. हवेली) येथील सतीश सुदाम थोपटे (वय ३८, रा. सुशीला पार्क, कोल्हेवाडी खडकवासला) यांचा बुधवारी (दि. २७) कोयत्याने वार करून खून करणार्या चौघांना हवेली पोलिसांनी गुरुवारी (दि. २८) अटक केली. या हल्ल्यातील भाऊसाहेब किवळे हा अद्याप फरार आहे. त्याचा शोध सुरू असल्याचे हवेलीचे पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी सांगितले.

सोहेल ऊर्फ फुक्या साजिदअलि जोरा ( वय १९), अक्षय उर्फ बाबू बालाजी शेलार (वय २४, दोघेही रा. शिवरे, ता. भोर), देविदास उर्फ देवा लक्ष्मण तांबट ( वय २०, रा.कांजळे, ता. भोर), जीवन ऊर्फ बाळ्या शैलेश जगताप ( वय २७, रा. दत्तवाडी, पुणे) अशी अटक करण्यात




आलेल्यांची नावे आहेत. हवेली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, थोपटे याच्या घरावर नांदोशीचे माजी सरपंच भाऊसाहेब किवळे याने २५ लाख रुपयांचे कर्ज काढले होते. कर्जाची रक्कम भरावी अशी मागणी थोपटे हा किवळेकडे करीत होता. किवळे याने ३५ लाखाची गाडी घेतली मात्र कर्ज देण्यासाठी त्याच्याकडे पैसे नाहीत असे स्टेटस थोपटे याने मोबाईलवर ठेवले. त्यामुळे चिडून जाऊन किवळे याच्या सांगण्यावरून चौघां हल्लेखोरांनी कोयत्याने वार करून थोपटे याचा खून केला. या प्रकरणी थोपटे याच्या पत्नीने हवेली पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. घटनेचे गांभीर्य पाहून पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या देखरेखीखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या पथकासह पोलीस निरीक्षक वांगडे, सहायक पोलीस निरीक्षक सागर पवार, पोलीस उपनिरीक्षक संजय सुतनासे, हवालदार संतोष तोडकर, विलास प्रधान, महेंद्र चौधरी, दिपक गायकवाड, व्यंकट काळे, सचिन गुंड यांच्या पथकाने हल्लेखोरांना जेरबंद केले. मयत थोपटे याच्याविरोधात हवेली पोलीस ठाण्यात या पुर्वी खानापूर येथे दुकानदारावर गोळीबार केल्याचा गुन्हा दाखल आहे. हल्लेखोर तांबट याच्यावरही गंभीर गुन्हे दाखल असल्याचे हवेली पोलिसांनी सांगितले.

# पीएमआरडीएचा विकास आराखडा अडचणीत ? ११७ गावांतील बांधकाम परवानगीचे अधिकार एमएसआरडीसीला

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पुणे रिंगरोड हा प्रकल्प हाती घेतला असून, तो प्रकल्प डिझाइन बिल्ड फायनान्स ऑपरेट-ट्रान्सफर या तत्त्वावर उभारला जाणार आहे. विधानसभेच्या आचारसंहितेच्या अगोदर राज्य शासनाने या रिंगरोडच्या दोन्ही बाजूस एक किलोमीटरच्या अंतरातील ११७ गावांतील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीएकडून काढून एमएसआरडीसीला दिले आहेत. त्यासाठी एमएसआरडीसीला 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून दर्जा देण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे पीएमआरडीएचा प्रारूप विकास आराखडाच अडचणीत येण्याची शक्यता आहे.

पुणे आणि पिंपरी- चिंचवड महापालिका हद्दीतील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी एमएसआरडीसीकडून रिंगरोडचे काम हाती घेण्यात आले आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण करून




या रस्त्याच्या कामांच्या निविदांना देखील मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी राज्य सरकारने रिंगरोडच्या दोन्ही बाजूस एक किलोमीटरच्या परिघात असलेल्या ११७ गावांच्या विकासाचा अधिकार 'एमएसआरडीसी'ला देऊन विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. त्यावरून आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुणे महानगरचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी २०१५ मध्ये राज्य सरकारकडून पीएमआरडीएची स्थापना करण्यात आली. सुमारे सात हजार चौरस किलोमीटर हद्द असलेल्या प्राधिकरणाच्या हद्दीतून हा रिंगरोड जातो. पीएमआरएकडून यापूर्वीच हद्दीचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. न्यायालयीन प्रक्रियेमुळे हा आराखडा मान्यतेच्या प्रतीक्षेत आहे. असे असतानाच राज्य सरकारने हा निर्णय घेतल्यामुळे प्राधिकरणाच्या विकास आराखड्यात अडचणी येणार आहे.

# शिंदेंच्या मुख्यमंत्रिपदासाठी बनेश्वरला अभिषेक

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला एकहाती सत्ता मिळाल्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी दावा सोडला असल्याचे जाहीर केले, मात्र शिंदे हेच मुख्यमंत्री व्हावे, अशी मनोकामना करत भोर तालुक्यातील शिवसैनिकांनी बनेश्वराला साकडे घातले आहे.



नसरापूर (ता. भोर) येथील बनेश्वर मंदिरात मुख्यमंत्रिपदी पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांची निवड व्हावी, यासाठी महादेवाला शिवसैनिकांच्या वतीने दुग्धअभिषेक करण्यात आला. या वेळी शिवसेनेचे भोर तालुकाप्रमुख अमोल पांगारे, विभागप्रमुख मंगेश तनपुरे, राहुल पांगारे, चेतन पांगारे, राहुल मिसाळ, अमित गुरव, अजिंक्य पांगारे, प्रसन्न गयावळ, ऋषिकेश खवले आदी शिवसैनिक उपस्थित होते. दरम्यान, मुख्यमंत्रिपदाबाबत दिल्लीत खलबते सुरू असतानाच आता राज्यात एकनाथ शिंदे यांच्यासाठी देवाला साकडे घालण्यात येत आहे. राज्यपाल यांनी शिंदे यांच्यावर नवे सरकार राज्यात येईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सोपवली आहे. वरिष्ठ पातळीवर होणारे निर्णय आम्हाला मान्य आहेत, मात्र एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील जनतेच्या हिताचे काम केले आहे. त्यामुळे शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, अशी शिवसैनिकांची इच्छा असल्याचे शिवसेनेचे भोर तालुकाप्रमुख अमोल पांगारे यांनी सांगितले.

# पुणे पुस्तक जत्रा येत्या बुधवारपासून

**पुणे । प्रतिनिधी**

'ज्ञानसंपन्न समाजाच्या दिशेने' या ब्रीदवाक्यावर आधारित २२ वी पुणे पुस्तक जत्रा (पुणे बुक फेअर) येत्या बुधवारपासून रविवारपर्यंत (ता. ४) ते ८) स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आली आहे.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते टिळक रस्ता येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात बुधवारी सकाळी ११ वाजता उद्घाटन कार्यक्रम होईल, अशी माहिती पुणे पुस्तक जत्रेचे संयोजक पी. एन. आर. राजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे महानगर पालिका, महाराष्ट्र युनिव्हर्सिटी आणि कॉलेज लायब्ररी असोसिएशन, आकाशवाणी आणि महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने हे प्रदर्शन भरविले जात आहे. उद्घाटनप्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भाऊसाहेब कारेकर, 'मसाप'चे



कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीता राजे पवार, प्रसार भारतीचे इंद्रजित बागल, 'बालभारती'चे संचालक कृष्णकुमार पाटील उपस्थित राहणार आहेत. प्रदर्शनानिमित्त 'मसाप'तर्फे चित्रकार रविमुकुल यांची मुलाखत, 'लेखक आपल्या भेटीला', निमंत्रितांचे कवी संमेलन हे कार्यक्रम मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात होणार आहेत.

# स्मार्ट सिटी सुरूच राहणार ; एटीएमएसने दाखविली प्रकल्प चालविण्याची तयारी

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र शासनाने स्मार्ट सिटी प्रकल्प बंद करणार असल्याचे स्पष्ट केले असले, तरी मार्च २०२५ पर्यंत त्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, त्यानंतरही स्मार्ट सिटी सुरू राहणार असल्याचे समोर आले आहे. स्मार्ट सिटीअंतर्गत शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उभारण्यात आलेली एटीएमएस सिंग्नल यंत्रणेची जबाबदारी पुढील पाच वर्षे स्वीकारण्याची तयारी स्मार्ट सिटी प्रशासनाकडून दाखविण्यात आली आहे. त्यासाठीचे पत्र नुकतेच महापालिकेस देण्यात आले असून, स्मार्ट सिटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी यांनी दिली.




स्मार्ट सिटी बंद होणार असल्याने हा प्रकल्प वाहतूक पोलिसांकडे हस्तांतरीत केला जाणार होता. मात्र, त्यांनी नकार दिल्याने तो महापालिकाच चालविणार असे चित्र होते. मात्र, आता स्मार्ट सिटीने पुढील पाच वर्षे त्याची जबाबदारी स्वीकारल्याने तो त्यांच्याकडेच राहणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

अशी आहे योजना

या प्रकल्पाअंतर्गत शहरातील १२४ चौकांमध्ये अत्याधुनिक सिंग्नल यंत्रणा बसविण्यात आली आहे. वाहनांची वर्दळ आणि वाहतुकीचा वेग लक्षात घेऊन ही यंत्रणा शहरातील सर्व सिंग्नलचे नियंत्रण करते. या प्रकल्पासाठी सुमारे १०२ कोटींचा खर्च करण्यात आला असून, ही यंत्रणा उभारणाऱ्या कंपनीस प्रत्येक वर्षासाठी ११ कोटींचा देखभाल दुरुस्तीचा खर्च महापालिका देणार आहे. त्यानुसार महापालिकेने हा खर्च स्मार्ट सिटीला द्यावा. त्यानुसार कंपनीस हे पैसे दिले जातील, असे महापालिकेस कळविण्यात आले आहे

# पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशनचा पदग्रहण सोहळा संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

नेहरूनगर पिंपरी न्यायालयात वकील पुरुष रूममध्ये पुण्याचा शनिवार वाड्याला आग लावून पुरोहितांच्या छाताडावर पाय रोवून.. विद्येविना मती गेली। मतिविना नीती गेली। नीतिविना गती गेली। गतिविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले। असे छातीठोक सांगून शिक्षण आणि उद्धाराचा अध्याय बहुजनांचा घराघरात रचनारे क्रांतीबा महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुण्यतिथी दिनानिमित्त महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र पूर्वक अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात ही मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून केली.पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशन सन २०२४ व २०२५ च्या नवनिर्वाचित कार्यकारिणीला मागील वर्षातील सन २०२३-२०२४ च्या प्रथम महिला अध्यक्ष प्रमिला गाडे मॅडम व कार्यकारणीने पदभार नवनिर्वाचित कार्यकारिणीला सुपूर्द केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुण मामा खरात तर प्रमुख उपस्थिती मा. उपाध्यक्ष प्रतीक जगताप हे होते. पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशनची सन २०२४-२०२५ सार्वत्रिक निवडणूक पार पडली सदर निवडणुकीचे निवडणूक अधिकारी म्हणून मा. अध्यक्ष नारायण (नाना) रसाळ यांनी काम पाहिले नाना रसाळ यांनी सदरची निवडणूक कायदेशीरपणे शिस्तबद्ध नियोजनबद्ध घडवून आणली व निवड झालेल्या अधिकृत उमेदवाराची यादी जाहीर केली.





निवडणूक अधिकारी यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारणी यांना शुभेच्छा दिल्या तसेच प्रमुख उपस्थिती मा.उपाध्यक्ष प्रतीक जगताप यांनी मागील सन २०२३- २०२४ च्या कार्यकारणीने केलेल्या कामकाजाचा उल्लेखनीय आढावा घेतला व नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारणी यांनी वकील हिताच्या बाजूने वर्षभरात काम करावे अशा कौतुकास्पद शुभेच्छा दिल्या. तसेच मागील वर्षाचे अध्यक्ष प्रमिला गाडे मॅडम यांनी वर्षभरात केलेल्या कामकाजाचा आढावा सांगितला. वकील हिताच्या दृष्टीने कामकाज केले. आरोग्य शिबीर घेतले नवीन कायद्याचे लेक्चर घेतले वकील वर्ग मोठ्या प्रमाणात मानसिक त्रासाला वैतागून जातात या दृष्टीने वकील वर्गा मनोबल वाढवण्यासाठी एक दिवसीय सहल चे आयोजन केले अशा विविध गोष्टीवर प्रकाश टाकला.

तसेच मा.उपाध्यक्ष गोरख कुंभार यांनी वर्षभरात आलेल्या अडी अडचणी असताना त्यावर कशी मात केली याबाबत अधिक माहिती दिली..

नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारिणी यांनी मागील वर्षाचे अध्यक्ष व कार्यकारणी यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. व नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारिणी यांना निवडणूक अधिकारी यांनी प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे देऊन सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. नवनिर्वाचित अध्यक्ष पांडुरंग शिनगारे यांनी आपण यापुढेही वकील हिताच्या दृष्टीने योग्य ते निर्णय घेऊन मागील वर्षीच्या कार्यकारणीच्या साथीने यावर्षीही कामकाज करू अशी ग्वाही दिली व शुभेच्छा स्वीकारल्या.कार्यक्रमा वेळी उपस्थित मा.अध्यक्ष सुनील कडुसकर मा.अध्यक्ष किरण पवार मा.अध्यक्ष सुदाम साने, ज्येष्ठविधीतज्ञ ॲड.बी.क. कांबळे, ॲड.शशिकांत गावडे,ॲड. प्रताप कडुस,मा.उपाध्यक्ष ड.योगेश थांबा,ॲड.योगेश मळेवाडी,ॲड.तेजस चवरे, ॲड.पल्लवी कुऱ्हाडे,ॲड.सागर आडागळे सूर्या महेंद्र दांडगे अतुल कांबळे,अधिक चरेगावकर तुषार खरात घोलप,नारायण थोरात, ॲड.विजय भगत,ॲड. शांताराम दामगुडे,ॲड.अनिल शेजवानी, ॲड. ,विनोद आढाव, ॲड.डांगे सर, ॲड.धीरज कुचेरिया,ॲड.भवले सर,ॲड.प्रिया रसाळ, ॲड.ओमकार नानेकर,ॲड.नाझिया मॅडम,ॲड.पुनम शर्मा,ॲड.पुनम राऊत, ॲड.साक्षी झिरवनकर सोनवणे इत्यादी वकील वर्ग हजर होते.नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. पांडुरंग विठ्ठल शिनगारे उपाध्यक्ष ॲड. अजय रामसुमेर यादव सचिव ॲड. संदिप भाऊसाहेब तापकीर महिला सचिव ॲड. संगीता रमेश कुशलकरसहसचिव ॲड. पदमावती लक्ष्मण पाटील , खजिनदार ॲड. विशाल आसाराम पोळ , हिशोब तपासनीस पदी ॲड. प्रेरणा हरेश चंदानी, तसेच सदस्य पदी ॲड. विजय धोंडिराम भोंडे, ॲड. अक्षय कमलाकर चौधरी, ॲड. आरती दत्तात्रय कुलकर्णी, ॲड. पौर्णिमा भगवान मोहिते, ॲड. रूपाली रामचंद्र पवार , ॲड. सुषमा सुदर्शन पाटील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.विशाल पोळ व ॲड.सुनील कडूसकर यांनी केले व आभार प्रदर्शन ॲड.संदीप तापकीर यांनी केले.